नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५२ * अंक २१० * * अकोला * सोमवार, दिनांक २ फेब्रुवारी २०२६ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## मुंबई-पुण्यासह ७ मार्गांवर अतीजलद रेल कॉरिडॉर्स

नवी दिल्ली, दि. १ प्रतिनिधी

देशाचं रेल्वे जाळे विस्तारित आणि गतीमान करण्याकरता केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२७ मध्ये मोठा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार, ७ हायस्पीड रेल्वे कॉरिडॉरची घोषणा अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी केली. याचा फायदा मुंबई, पुणे, हैदराबाद, बंगळुरू, चैन्नई, दिल्ली, वाराणसी आणि सिलिगुडी या प्रमुख शहरांना होणार आहे. निर्मला सीतारमण म्हणाल्या, "पर्यावरणदृष्ट्या शाश्वत प्रवासी व्यवस्थांना प्रोत्साहन देण्यासाठी, आम्ही शहरांमध्ये विकास जोडणारे सात हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉर विकसित करू. मुंबई ते पुणे, पुणे ते हैदराबाद, हैदराबाद ते बेंगळुरू, हैदराबाद ते चेन्नई, चेन्नई ते बेंगळुरू, दिल्ली ते वाराणसी आणि वाराणसी ते सिलीगुडी या शहरांमध्ये स्पीड रेल्वे कॉरिडोर विकसित करणार आहोत."

## सोने-चांदीची व्यथा

अग्राग्रलेख खरीखरी..
श्रीकृष्ण चांडक



तीन दिवसांपूर्वी चार लाखापर्यंत केलेली चांदी आज अडीच लाखाच्या दरम्यान आलेली आहे. तीच परिस्थिती सध्या सोन्याचीही आहे. दोन लाखांच्या जवळपास पोहोचलेली प्रतितोळा सोन्याची किंमत आता दीड लाखाच्याही खाली आहे.

गेल्या दोन-तीन महिन्यापासून सोने आणि चांदीच्या दरात दररोज उलथापालथ होत होती ती अत्यंत चिंतनिय आहे. आपल्या देशात मोठमोठ्या तालेवार घराण्यांपासून अगदी लहानात लहान आणि कमीत कमी उत्पन्न असलेल्या घरांत देखील त्यांच्या त्यांच्या उत्पन्नाच्या प्रमाणात सोने सर्वांच्याच घराची शोभा वाढवित असते. आपल्या देशातील लग्ने सोन्याच्या खरेदी शिवाय पूर्ण होत नसतात. गेल्या काही दिवसापासून जागतिक परिस्थितीमुळे सोने आणि चांदी यांच्या दराच्या बाबतीत दररोज ज्या उलाढाली होत आहेत त्यावरून भल्याभल्यांची दांडी उडत आहे. भारतात सरकार जवळ साधारणपणे ८०० टन सोने आहे. त्या तुलनेत अमेरिकेजवळ आठ हजार टन, चीन जवळ ३००० टन आणि इतर श्रीमंत देशांकडेही मोठ्या प्रमाणात सोन्याचा साठा आहे. आपल्या देशात जेवढे सोने सरकार जवळ आहे त्यापेक्षा दोन ते अडीच पट जास्त सोने नागरिकांजवळ असेल. हे सर्व सोने आता किमतीच्या बाबतीत कसे, किती आणि काय बदल घडतात याचा अभ्यासही मनोरंजक ठरावा. सामान्य माणसासाठी एक तोळा म्हणजे पूर्वी असलेल्या १२ ग्राम सोन्याऐवजी आजच्या काळात हे प्रमाण दहा ग्राम वर आलेले आहे. पण आताच्या परिस्थितीत दहा ग्रामसाठी दीड ते दोन लाख रुपये खर्च करणे श्रीमंत मध्यमवर्गाला देखील शक्य होत नाही. तरी आपल्या देशातील महानगरांपासून ते छोट्या नगरांपर्यंत आणि छोट्या नगरांपासून ते अगदी गावांपर्यंत सोने-चांदीचे दागिने विकणाऱ्या सराफांची दुकाने गल्लोगल्ली दिसून येतात. पूर्वीच्या काळी एखाद्या मुलीसाठी लग्नाच्या वेळी मंगळसूत्र तयार करताना एक किंवा दोन तोळे सोन्याची खरेदी होत असे. आता हे मंगळसूत्रही एक किंवा दोन ग्राम सोन्यामध्ये बनवण्यात येते. सध्या ज्या सोन्याच्या किमती आहेत त्यावरून यापुढे एक ग्राम पेक्षाही कमी वजनाचे मंगळसूत्र बाजारात येण्याची शक्यता नाकारता येत नाही. सर्वसामान्य लोकांसाठी लग्नाच्या वेळी सोन्याची खरेदी करण्याच्या विषयापेक्षा फारसा याचा संबंध येईल असे वाटत नाही, मग आपल्या देशातील गल्लोगल्लीत असणारी सोन्या-चांदीची दुकाने दररोज सोन्याचे दागिने तयार करून ते जर विकत नसतील. तर ही दुकानदार मंडळी स्वतःच स्वतःची बिन पाण्याने हजामत तर करून करणार नाहीत ना, असाही प्रश्न पडतो. म्हणजेच आपल्या समाजातील एक विशिष्ट वर्ग आजही सोने आणि चांदी यांची खरेदी करण्यात अग्रेसर असतो असा याचा सरळ अर्थ आहे. हा वर्ग कोणता आहे याची फोड न करताही आमच्या वाचकांना त्याची कल्पना आलीच असेल, यात अजिबात शंका नाही. चांदीचे भाव या वर्षभरात किती पटीने वाढावेत यालाही सीमा राहिलेली नाही. काही महिन्यांपूर्वी ५० हजारांच्या आसपास रेंगाळणारी चांदी आता चार लाख रुपये किलो पर्यंत पोहोचलेली होती. दोनेक वर्षांपूर्वी एखाद्याच्या लग्नात आहेर करताना चांदीचे शिक्के मुक्तपणे देण्यात येत असत. आता सामान्य जनांना ते देणेही आटोक्याबाहेरचे झालेले आहे. मधल्या काळात तर चांदीची विक्री थांबलीच होती. यापुढे आपल्याजवळ असलेल्या सोन्या-चांदीची किंमत कधी गगनाला गवसणी घालेल आणि अचानक कधी पाताळात गाडली जाईल हेही समजेनासे झालेले आहे. सोन्या-चांदीची अशी ही भयकथा यापूर्वी आपण कधीच अनुभवलेली नसेल. मात्र गेल्या काही महिन्यांपासून आपण सर्वजण अनुभवीत आहोत म्हणूनच सोन्यासारख्या शब्दांचा हा प्रपंच आपल्याला निदान वाचून आनंदित होण्यास भाग पाडील यात शंका नाही. सोने आणि चांदी या दोन धातूंची परस्पर होत असलेली व्यथाही आपण अनुभवली पाहिजे.

mahasagarngp@gmail.com
Mob. No. 9922970023

# आयकर 'जैसे थे'

## निर्मला सीतारमणांचा ९वा अर्थसंकल्प

## विकासासाठी सरकारचा तीन 'कर्तव्य' अजेंडा



नवी दिल्ली, दि. १ वृत्तसंस्था

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आज संसदेत केंद्र सरकारचा वार्षिक सर्वसाधारण अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पात सरकारने आर्थिक शिस्त, महसूल वाढ आणि दीर्घकालीन विकासावर भर दिला असला. सरकारने पायाभूत सुविधा, संरक्षण, डिजिटल इंडिया आणि उत्पादन क्षेत्रासाठी निधी वाढवण्यावर भर दिला आहे. रोजगार निर्मिती, स्टार्टअप्सना प्रोत्साहन आणि 'मेक इन इंडिया' योजनेला चालना देण्यासाठी विविध तरतुदी करण्यात आल्या आहेत. ग्रामीण विकास, कृषी क्षेत्र आणि महिला सक्षमीकरणासाठीही काही महत्त्वाच्या घोषणा करण्यात आल्या.

तर, काही निर्णयांमुळे शेअर बाजारात नाराजी दिसून आली. अर्थसंकल्पात फ्युचर आणि ऑप्शन व्यवहारांवरील सिक्युरिटी ट्रान्झॅक्शन टॅक्स (एसटीटी) वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच शेअर्सच्या बायबॅकचा पर्याय स्वीकारणाऱ्या गुंतवणूकदारांवरही कर लावण्यात आला आहे. अर्थसंकल्प जाहीर होताच शेअर बाजारात मोठी घसरण पाहायला मिळाली. मात्र भांडवली बाजाराशी संबंधित करांमध्ये वाढ, दीर्घकालीन भांडवली नफ्यावर करासंबंधी स्पष्ट दिलासा न मिळणे आणि काही शुल्क वाढवल्यामुळे गुंतवणूकदारांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. बाजार तज्ज्ञांच्या मते, या निर्णयांचा अल्पकालीन परिणाम नकारात्मक असू शकतो. एकूणच, निर्मला सीतारमण यांचा हा अर्थसंकल्प दीर्घकालीन विकासाचा रोडमॅप मांडतो, मात्र तात्काळ परिणाम म्हणून शेअर बाजार आणि गुंतवणूकदारांच्या भावना यावर त्याचा मोठा प्रभाव पडलेला दिसत आहे.

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी सादर केलेल्या २०२६ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात तीन प्रमुख कर्तव्यांवर विशेष भर देण्यात आला आहे.

**■ पहिले कर्तव्य**

देशाच्या आर्थिक विकासाचा वेग अधिक वाढवणे आणि तो दीर्घकाळ टिकवून ठेवण्यावर विशेष भर देण्यात येणार आहे. यासाठी देशाची उत्पादकता आणि स्पर्धात्मकता वाढवणे, उद्योगांना चालना देणे तसेच जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा निर्माण करण्यावर लक्ष केंद्रित केले जाणार आहे.

**■ दुसरे कर्तव्य**

देशातील जनतेच्या आकांक्षा पूर्ण करणे हा यामागील मुख्य उद्देश आहे. त्यासाठी नागरिकांचे कौशल्य विकास, क्षमतावृद्धी आणि रोजगारक्षमतेत वाढ करून त्यांना भारताच्या समृद्धीकडे वाटचाल करणाऱ्या विकासप्रक्रियेत सक्रियपणे सहभागी करून घेण्यात येणार आहे.

**■ तिसरे कर्तव्य**

'सबका साथ, सबका विकास' या तत्त्वावर आधारित सर्वसमावेशक विकास साध्य करणे हे या कर्तव्याचे ध्येय आहे. यामध्ये प्रत्येक कुटुंब, समाज आणि प्रदेशाला साधन-संपत्ती, मूलभूत सुविधा तसेच प्रगतीच्या समान संधी उपलब्ध करून देण्यावर भर दिला जाणार आहे.

**काय स्वस्त**

कॅन्सरची औषधे, मधुमेहाची औषधे, चामड्याची बूटे, क्रीडा साहित्य, मोबाईल फोन, ईव्ही बॅटरी, सौर पॅनेल, सीएनजी, वैद्यकीय उपकरणे, एलसीडी, एलईडी, भारतात बनवलेले कपडे, ईव्ही वाहने, मोटारसायकल, फ्रोझन मासे, अपघात विमा

**काय महाग**

इंटरॅक्टिव्ह फ्लॅट पॅनल डिस्प्ले, खनिज, दारु, सिगरेट, पीव्हीसी फ्लेक्स शीट्स

## शेतकऱ्यांसाठी घोषणांचा पाऊस!

नवी दिल्ली, दि. १ वृत्तसंस्था

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी २०२६ च्या अर्थसंकल्पात कृषी आणि संलग्न क्षेत्रांसाठी अनेक महत्त्वपूर्ण घोषणा केल्या आहेत. या अर्थसंकल्पात पारंपारिक शेतीसोबतच उच्च-मूल्य पिके, पशुसंवर्धन आणि मत्स्यव्यवसाय यांवर विशेष भर देण्यात आला असून ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी गती देण्याचा प्रयत्न सरकारकडून करण्यात आला आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आज १ फेब्रुवारी रोजी देशाचा २०२६-२७ या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प सादर केला. भारतीय कृषी क्षेत्र हे देशाच्या सामाजिक आणि आर्थिक रचनेचा अविभाज्य भाग असून कोट्यवधी नागरिकांची उपजीविका असलेल्या या क्षेत्रासाठी अर्थसंकल्पात अनेक महत्वाच्या घोषणा करण्यात आल्या आहेत.

**मत्स्य व्यवसायाला बळकटी**

अमेरिकेने लादलेल्या आयात शुल्काच्या पार्श्वभूमीवर आणि भारतीय सागरी उत्पादनांच्या निर्यातीला बसलेला फटका लक्षात घेता मच्छिमारांना मासेमारीवर शुल्क माफी दिली आहे. कारण शुल्कांनंतर अमेरिकेला होणाऱ्या कोळंबीच्या निर्यातीत मोठी घट झाली आहे. त्याचबरोबर मत्स्यव्यवसायाला बळकटी देण्यासाठी सरकार ५०० जलाशयांचा एकात्मिक विकास करणार आहे. केवळ मासेमारीच नव्हे, तर त्याची विक्री व्यवस्था सुधारण्यासाठी स्टार्टअप्स, महिला बचत गट आणि मत्स्यपालक उत्पादक संस्थांना थेट बाजारपेठेशी जोडले जाईल. यामुळे मच्छिमारांच्या उत्पन्नात मोठी वाढ होण्याची शक्यता आहे.

**काजू, कोको आणि चंदनाला बळ**

शेतकऱ्यांनी केवळ पारंपरिक पिकांवर अवलंबून न राहता 'हाय-व्हॅल्यू' पिकांकडे वळावे, यासाठी विशेष योजना आखण्यात आली आहे. नारळ, काजू आणि कोकोच्या उत्पादनासाठी विशेष पाठबळ दिले जाईल. अक्रोड आणि पाइन नट्सच्या उत्पादनावर लक्ष केंद्रित केले जाईल. तसेच चंदनासारख्या उच्च-मूल्य वृक्षांच्या लागवडीतून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे आणि रोजगाराच्या नवीन संधी निर्माण करणे हे सरकारचे उद्दिष्ट आहे.

**ग्रामीण रोजगाराला चालना**

ग्रामीण आणि निम-शहरी भागातील तरुणांना रोजगारासाठी शहरांकडे धाव घ्यावी लागू नये, यासाठी पशुपालन क्षेत्राचे आधुनिकीकरण केले जाणार आहे. यासाठी 'क्रेडिट-लिंक्ड सबसिडी' (कर्जाशी निगडित अनुदान) दिली जाईल. दूध आणि कुक्कुटपालन व्यवसायाची साखळी अधिक मजबूत करून उत्पादक संस्थांना प्रोत्साहन दिले जाईल.

## हे युवाशक्ती बजेट - पंतप्रधान मोदी

नवी दिल्ली, दि. १ वृत्तसंस्था

देशात सुधारणांची एक प्रेरणा सुरू झाली आहे. केलेले बदल भारतातील धाडसी आणि प्रतिभावान तरुणांना अभिव्यक्तीने भरलेले एक मुक्त आकाश प्रदान करतात, असे पीएम मोदी यांनी म्हटले आहे. मोदी म्हणाले की, हा अर्थसंकल्प सुधारणांना नवीन चालना देईल. कौशल्य, प्रमाण आणि शाश्वतता बळकट करण्याचा हा प्रयत्न आहे. सर्वात मोठी संपत्ती म्हणजे नागरिक, आम्ही त्यांच्यात गुंतवणूक केली आहे. हे अद्वितीय बजेट आहे, जे वित्तीय तूट कमी करण्यावर लक्ष केंद्रित करते. यासोबतच, अर्थसंकल्पात उच्च भांडवली खर्च आणि उच्च वाढ यांचा मेळ आहे. हे देशाच्या जागतिक भूमिकेला पुनरुज्जीवित करणार असून हा अर्थसंकल्प युवाशक्ती बजेट असल्याचे म्हणाले.

### चालू आर्थिक वर्षात वित्तीय तूट ४.४ टक्के राहणार

चालू आर्थिक वर्षात वित्तीय तूट ४.४ टक्के राहणार असल्याची माहिती अर्थमंत्र्यांनी दिली. पुढच्या आर्थिक वर्षात ही तूट जीडीपीच्या ४.३ टक्के राहिल. तसंच करांद्वारे २८ लाख कोटींचा महसूल मिळण्याची अपेक्षा असल्याचं त्यांनी सांगितलं.

### गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी सरकारची योजना

अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी त्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणात गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी कॉर्पोरेट आणि म्युनिसिपल बॉण्ड मार्केटला प्रोत्साहन देण्याचं आवाहन केलं. त्या म्हणाल्या की, भारताच्या बदलत्या आर्थिक प्राधान्यांशी परकीय गुंतवणूक जुळवण्यासाठी, सरकार कॉर्पोरेट बॉण्ड इंडेक्सवर आधारित निधी आणि डेरिव्हेटिव्ह्जपर्यंत पोहोचण्यासाठी बाजारपेठ तयार करणारी चौकट सादर करून कॉर्पोरेट बॉण्ड मार्केट मजबूत करण्याची योजना आखत आहे.

### फ्युचर अँड ऑप्शन्सवर करवाढ, शेअर बाजारात निराशा

शेअर बाजारात ट्रेडिंग करणाऱ्यांसाठी मोठा धक्का असून फ्युचर अँड ऑप्शनवर कर वाढवण्याची घोषणा केली. यानंतर शेअर बाजार जोरदार आपटल्याचा पाहायला मिळाला. यादरम्यान शेअर बाजारात १५०० अंकांपेक्षा अधिक घसरण झाली. आपल्या भाषणादरम्यान त्यांनी शेअर बायबॅकवर आता कॅपिटल गेन टॅक्स लागू होणार असल्याचे म्हटले. तसेच फ्युचर्स ट्रेडिंगवरील एसटीटी ०.०२ टक्क्यांवरुन ०.०५% पर्यंत वाढवण्यात आला असल्याची घोषणा अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी केली. यानंतर शेअर बाजारात मोठी घसरण पाहायला मिळाली.

### अघोषित उत्पन्नाची मर्यादा एक कोटी रुपयांपर्यंत ठेवण्याचा प्रस्ताव

अर्थमंत्र्यांनी टॅक्स फॉर्म सोपं करण्याबद्दल वक्तव्य केलं. दंडाऐवजी, कर भरून सूट मिळू शकते. खटले कमी करण्यासाठी पावलं उचलण्यात आली आहेत. शिवाय, अघोषित उत्पन्नाची मर्यादा एक कोटी रुपयांपर्यंत ठेवण्याचा प्रस्ताव आहे. आयकर रिटर्न ३१ जुलैपर्यंत दाखल करता येतील.

### कॉर्पोरेट बॉंड्सवर टोटल रिटर्न स्वॅप सुरू करणार

अर्थमंत्र्यांनी सांगितले की कॉर्पोरेट बॉंड्सवर टोटल रिटर्न स्वॅप सुरू केले जातील. महानगरपालिका बॉंड बाजाराला चालना देण्यासाठी, मोठ्या शहरांना विद्यमान अमृत योजनेच्या आधारे ₹१,००० कोटींपेक्षा जास्त रकमेचे बॉंड जारी करण्यासाठी ₹१०० कोटींचे प्रोत्साहन दिले जाईल.

### मंदिरांसाठी ₹५,००० कोटींची तरतूद

अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी त्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणात सांगितलं की मंदिर शहरं असलेल्या २-३ शहरांवर लक्ष केंद्रित केले जाईल. यासाठी ५,००० कोटी रुपयांची तरतूद केली जात आहे. सात हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉर देखील बांधले जातील असंही त्यांनी सांगितलं.

### एनआरआयसाठी वैयक्तिक गुंतवणूक मर्यादा वाढवली

परदेशात राहणाऱ्या भारतीयांसाठी वैयक्तिक गुंतवणूक मर्यादा ५% वरून १०% पर्यंत वाढवण्यात आली आहे. भारतीय बाजारपेठेत गुंतवणूक करण्यासाठी प्रोआयना परवानगी. प्रोआयना गुंतवणूक मर्यादा १०% वरून २४% पर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव असल्याचं अर्थमंत्र्यांनी सांगितलं.

### कर्करोग आणि मधुमेहाची औषधे स्वस्त होणार

अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी त्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणात सांगितलं की, देशातील बायोफार्मास्युटिकल क्षेत्राच्या विकासामुळे कर्करोग आणि मधुमेहासारख्या गंभीर आजारांवरील औषधं स्वस्त होतील. सीतारमण यांनी १०,००० कोटी रुपयांचा एसएमई ग्रोथ फंडही जाहीर केला. भविष्यातील नोकऱ्या निर्माण करण्यासाठी आणि निवडक निकषांवर आधारित उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी सरकार १०,००० कोटी रुपयांचा समर्पित एसएमई ग्रोथ फंड सुरू करण्याचा प्रस्ताव ठेवत असल्याचं त्यांनी सांगितलं.

### खादी आणि हस्तकला टेक्स्टाईलला बळकटी

अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी त्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणात खादी आणि हस्तकला टेक्स्टाईलला बळकटी देण्यासाठी एक योजना प्रस्तावित केली. त्यांनी वस्त्रोद्योग कामगार प्रोत्साहन योजना आणि राष्ट्रीय हातमाग आणि हस्तकला कार्यक्रमाची घोषणा केली. अर्थमंत्र्यांनी सांगितले की आव्हानात्मक मोडमध्ये मेगा टेक्सटाईल पार्क स्थापन करण्याची योजना प्रस्तावित आहे. खादी आणि हस्तकला टेक्स्टाईलला बळकटी देण्यासाठी एक योजना विकसित करण्यात आली आहे. याअंतर्गत महात्मा गांधी ग्राम स्वराज उपक्रम सुरू केला जाईल.

### रोजगार, स्थानिक विकासासाठी पर्यटनावर लक्ष

युवकांच्या रोजगारासाठी आणि स्थानिक विकासासाठी पर्यटनावर अर्थसंकल्पात लक्ष केंद्रित केलं आहे. अर्थसंकल्पात पर्यटनाला त्याच्या रोजगार आणि विकास धोरणाच्या केंद्रस्थानी ठेवण्यात आले आहे, रोजगार निर्मिती, परकीय चलन कमाई आणि स्थानिक आर्थिक विकासातील त्याची भूमिका यावर लक्ष केंद्रित केलं आहे. संपूर्ण भारतात या क्षेत्राला बळकटी देण्यासाठी सरकारने संस्था-बांधणी, कौशल्य विकास, डिजिटल दस्तऐवजीकरण आणि इको-टुरिझम उपक्रमांचे मिश्रण सुरू केले आहे.

## संरक्षण क्षेत्रासाठी विक्रमी ७.८ लाख कोटींची तरतूद

नवी दिल्ली, दि. १ वृत्तसंस्था

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आज संसदेत सादर केलेल्या केंद्रीय अर्थसंकल्पात संरक्षण मंत्रालयासाठी विक्रमी ७.८ लाख कोटींची तरतूद जाहीर केली आहे. ही तरतूद मागील आर्थिक वर्षातील ६.८१ लाख कोटींच्या तुलनेत लक्षणीय वाढ दर्शवते. या अर्थसंकल्पातून सरकारचा स्पष्ट संदेश आहे की, देशाची सुरक्षा, सैन्याची ताकद आणि स्वदेशी संरक्षण उत्पादनाला सर्वोच्च प्राधान्य असेल. रशिया-युक्रेन युद्ध, मध्य पूर्वेतील अस्थिरता, भारत-चीन सीमावाद आणि भारत-पाकिस्तान सीमेवरील आव्हाने पाहता भारताला आपली संरक्षण क्षमता मजबूत करण्याची गरज होती. ड्रोन युद्ध, सायबर हल्ले आणि अत्याधुनिक शस्त्रास्त्रांचे महत्त्व वाढले असून, हा अर्थसंकल्प त्या दिशेने मोठे पाऊल मानला जात आहे.

## महिलांसाठी "शी मार्ट्स" योजनेची घोषणा

नवी दिल्ली, दि. १ वृत्तसंस्था



केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आज संसदेत २०२६-२७ चा अर्थसंकल्प सादर केला. नेहमीप्रमाणे, अर्थमंत्र्यांनी आपल्या भाषणात महिलांसाठी विशेष योजनांची घोषणा केली. तर, या अर्थसंकल्पात महिलांसाठी काय खास होते ते जाणून घेऊया. केंद्र सरकारने लखपती दीदी योजना सुरू ठेवण्याची घोषणा देखील केली आहे. या योजनेअंतर्गत, महिला बचत गटांना ५ लाखांपर्यंतचे व्याजमुक्त कर्ज दिले जाते, ज्यामुळे त्यांना आर्थिक स्वातंत्र्य मिळते. महिलांना या कर्जांवर सरकारी अनुदान देखील मिळते.

केंद्र सरकारच्या लखपती दीदी योजनेच्या यशानंतर, अर्थमंत्र्यांनी "शी मार्ट्स" ची घोषणा केली. हे मार्ट्स स्वयं-मदत उद्योजकांद्वारे चालवले जातील आणि किरकोळ विक्री केंद्र म्हणून काम करतील.

## १ एप्रिलपासून नवा आयकर कायदा

नवी दिल्ली, दि. १ वृत्तसंस्था

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात करदात्यांसाठी अनेक महत्त्वपूर्ण घोषणा केल्या आहेत. १ एप्रिल २०२६ पासून देशात नवीन 'इन्कम टॅक्स ॲक्ट २०२५' लागू होणार असून, याद्वारे कर प्रणाली अधिक सुलभ करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. तसेच केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी अर्थसंकल्पात आयटीआर भरण्यासाठी अंतिम मुदत सांगितली आहे.

### आयटीआर अपडेटसाठी आता ३१ मार्चपर्यंत मुदत

करदात्यांना मोठा दिलासा देत सरकारने रिवाइज्ड रिटर्न भरण्याची मुदत वाढवली आहे. जर तुमच्याकडून टॅक्स रिटर्न भरताना काही चूक झाली असेल, तर ती सुधारण्यासाठी आता संबंधित वर्षाच्या ३१ मार्चपर्यंत वेळ मिळेल. मात्र, मूळ रिटर्न भरण्याची अंतिम तारीख ३१ जुलै (पगारदार लोकांसाठी) हीच कायम असेल. नॉन-ऑडिट बिझनेस आणि ट्रस्टसाठी ही मुदत ३१ ऑगस्टपर्यंत असेल.

### उत्पन्न लपवल्यास १००% दंड!

उत्पन्नाची चुकीची माहिती देणे किंवा करचोरी करणे आता महाग पडणार आहे. जर एखाद्या करदात्याने जाणूनबुजून चुकीची माहिती दिल्यास आता थकीत कराच्या १०० टक्के दंड भरावा लागेल. प्रामाणिक करदात्यांना प्रोत्साहन आणि करचोरांना चाप लावण्यासाठी हा कडक नियम करण्यात आला आहे.

### परदेशी प्रवासासाठी 'टीसीएस' मध्ये कपात

परदेशात फिरायला जाणाऱ्यांसाठी आनंदाची बातमी आहे. परदेशी टूर पॅकेजवर आकारला जाणारा टीसीएस जो पूर्वी ५ टक्के ते २० टक्के होता, तो आता थेट २ टक्के करण्यात आला आहे. यामुळे परदेश प्रवास स्वस्त होणार असून पर्यटकांवरील कराचा बोजा कमी होईल.

### परदेशी मालमत्ता जाहीर करण्याची सुवर्णसंधी

ज्या लहान करदात्यांनी आपली परदेशातील मालमत्ता पूर्वी जाहीर केली नसेल, त्यांच्यासाठी ६ महिन्यांची विशेष सवलत योजना जाहीर केली आहे. या काळात करदाता आपली मालमत्ता स्वतःहून जाहीर करू शकतो, जेणेकरून भविष्यातील कडक कारवाई टाळता येईल.

### अनिवासी भारतीयांच्या मालमत्ता विक्रीवर टीडीएस

जर एखादा अनिवासी भारतीय भारतात आपली स्थावर मालमत्ता विकत असेल, तर आता विक्रीच्या वेळीच टीडीएस कापला जाईल.

### "प्रामाणिक करदात्यांना त्रास नाही"

अर्थमंत्र्यांनी स्पष्ट केले की, नवीन कर नियमांमुळे कर प्रणाली सोपी होईल आणि सर्वसामान्यांचा गोंधळ कमी होईल. १ एप्रिलपासून लागू होणारे नवीन नियम आणि फॉर्म्स अशा प्रकारे तयार केले आहेत की, नागरिक स्वतःहून कोणतीही अडचण न येता कर भरू शकतील.

## भारताला बायोफार्मा हब बनवण्यासाठी १०००० कोटींची तरतूद

नवी दिल्ली, दि. १ वृत्तसंस्था

अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी पुढील ५ वर्षांसाठी १००००कोटी रुपयांच्या वाटपासह बायो फार्मा शक्ती कार्यक्रमांतर्गत भारतातील बायोफार्मा क्षेत्राला चालना देण्याचा प्रस्ताव दिला आहे.

बायो फार्मा शक्तीचा उद्देश बायोफार्मा आणि बायोसिमिलर्ससाठी इकोसिस्टम तयार करणे आहे, असे त्यांनी संसदेत अर्थसंकल्प सादर करताना सांगितले.

इतर घोषणांबरोबरच, त्यांनी धोरणात्मक आणि सीमावर्ती क्षेत्रांमध्ये उत्पादन वाढवण्याचा आणि शहरी आर्थिक क्षेत्रे विकसित करण्याचा प्रस्ताव दिला.

अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आपल्या सुरुवातीच्या भाषणात सांगितले की, त्यांच्या सरकारने पदभार स्वीकारल्यापासून, भारतीय अर्थव्यवस्थेचा मार्ग वित्तीय शिस्त आणि शाश्वत वाढीने दर्शविला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने द्विधा मनस्थितीऐवजी कृती आणि वक्तृत्वापेक्षा सुधारणा निवडल्या आहेत, आत्मनिर्भरता किंवा स्वावलंबनाला प्राधान्य दिले आहे यावर त्यांनी भर दिला.

## शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले - विजय वडेट्टीवारांची अर्थसंकल्पावर टीका

चंद्रपूर, दि. १ प्रतिनिधी



आज सादर झालेला केंद्रीय अर्थसंकल्प म्हणजे महाराष्ट्राच्या जखमेवर मीठ चोळणारा आणि राज्याच्या वाट्याला पुन्हा एकदा घोर निराशा आणणारा ठरला आहे. देशाच्या तिजोरीत सर्वाधिक कर देणारा आणि भारताच्या जीडीपीमध्ये सिंहाचा वाटा उचलणारा महाराष्ट्र आज पुन्हा एकदा रिकाम्या हाताने उभा आहे. केंद्राने महाराष्ट्राचा कर घ्यायचा आणि निधी मात्र इतर राज्यांच्या झोळीत टाकायचा, हा अन्याय आहे, अशी टीका कॉंग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली.

अर्थसंकल्प म्हणजे शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले आहे. शेतमालाला भाव नाही, शेतमाल साठवण्यासाठी गोदामे, कोल्ड स्टोरेज आणि नवीन बाजारपेठांची गरज असताना, त्यासाठी निधीची तरतूद नाही. शेती व्यवसायाचा कणा असलेल्या पायाभूत सुविधांकडे पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आले आहे.

खतांच्या वाढलेल्या किमती, वाढलेला उत्पादन खर्च आणि हमीभावाचा प्रश्न आजही अधांतरीच आहे. घोषणांचा पाऊस पडला, पण प्रत्यक्ष शेतकऱ्याच्या खिशात दोन रुपये पडतील अशी एकही ठोस योजना यात दिसत नाही.

सरकार फक्त मोठ्या घोषणा करत आहे, मात्र शेतीला प्रगत बनवण्यासाठी आवश्यक असलेले तंत्रज्ञान आणि ग्रामीण पायाभूत सोयीसुविधांसाठी लागणारा पैसा कुठे आहे? एआय साठी निधी देण्याची घोषणा केंद्रीय अर्थमंत्र्यांनी केली.महाराष्ट्रात देखील एआय साठी ५०० कोटींच्या निधीची तरतूद केली होती, त्यातील एक रुपया खर्च झाला का? हे बजेट केवळ काही मोजक्या उद्योगपतींच्या फायद्याचे असून, देशाच्या अन्नदात्याला मात्र पुन्हा एकदा वाऱ्यावर सोडले आहे, अस वडेट्टीवार म्हणाले.

## विकसित भारताकडे दमदार पाऊल - मुख्यमंत्री

मुंबई, दि. १ प्रतिनिधी



केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात करदात्यांसाठी अनेक महत्त्वपूर्ण घोषणा केल्या आहेत. १ एप्रिल २०२६ पासून देशात नवीन 'इन्कम टॅक्स ॲक्ट २०२५' लागू होणार असून, याद्वारे कर प्रणाली अधिक सुलभ करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. तसेच केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी अर्थसंकल्पात आयटीआर भरण्यासाठी अंतिम मुदत सांगितली आहे. या अर्थसंकल्पावर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली.

"विकसित भारताकडे दमदार पाऊल टाकणारा हा अर्थसंकल्प आहे. शहरीकरणाला नियोजनबद्ध करुन, उद्योग आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देऊन, गुंतवणूक आणि रोजगार निर्मितीसाठी खंबीर उपाययोजना या अर्थसंकल्पातून करण्यात आल्या आहेत. पायाभूत सुविधा क्षेत्रात १२ लाख कोटींची गुंतवणूक, शेती, पशुपालन, मत्स्यव्यवसाय आणि सिंचन यासाठी भरीव तरतुदी करण्यात आल्या आहेत. लखपती दिदी योजनेच्या यशानंतर महिलांसाठी स्वतंत्र मॉल्स आणि उद्योगांच्या संधी तयार करण्याची योजना अत्यंत महत्त्वाची आहे. प्रत्येक जिल्ह्यात उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी वसतीगृहांची योजना तयार करण्यात आली आहे. जिल्हा रुग्णालयात आपात चिकित्सा व्यवस्था उभी करण्याचा निर्णय आरोग्य क्षेत्रात मोलाचा ठरेल. मुंबई-पुणे, पुणे-हैदराबाद हायस्पीड कॉरिडॉरमुळे जीडीपीत मोठी वाढ होईल. प्रत्येक ग्रोथ हबसाठी ५००० कोटी प्रत्येकी ५ वर्षात प्राप्त होणार आहेत, त्याचा लाभ मुंबई महानगर (एमएमआर), पुणे महानगर, नागपूर महानगर ग्रोथहबसाठी होणार आहे," असे ट्विट देवेंद्र फडणवीस यांनी केले.

# अजितदादा जवळजवळ सर्वच गोष्टी माझ्याशी बोलायचे

## आम्हाला न सांगता विलिनीकरणाची चर्चा करतील का? देवेंद्र फडणवीस

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ :
उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाच्या चर्चेने राज्याच्या राजकारणात मोठे वादळ निर्माण केले आहे. "दोन्ही पक्ष १२ फेब्रुवारीला एकत्र येणार होते," या शरद पवार आणि जयंत पाटील यांचा दावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खोडून काढला आहे. "अजित पवार भाजपशी चर्चा केल्याशिवाय विलीनीकरणाचा निर्णय घेतील का?" असा थेट सवाल करत, राष्ट्रवादीने असा कोणताही निर्णय घेण्यापूर्वी भाजपशी चर्चा करणे आवश्यक असल्याची 'अट' मुख्यमंत्र्यांनी घातली आहे.



शरद पवार गटाकडून असा दावा केला जात आहे की, अजित पवार स्वतः विलीनीकरणासाठी आग्रही होते आणि त्यासाठी अनेक गुप्त बैठकाही झाल्या होत्या. यावर भाष्य करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, "जर चर्चा अंतिम टप्प्यात असती आणि १२ फेब्रुवारी ही तारीख निश्चित झाली असती, तर अजितदादांनी आम्हाला नक्कीच कळवले असते. अशा कोणत्याही तारखेची माहिती आम्हाला नाही. अजित पवार आणि मी तासनतास चर्चा करत बसलो होतो. अजितदादा जवळजवळ सर्वच गोष्टी माज्याशी बोलायचे. पण त्यांनी विलीनीकरणाबाबत असा कोणताही शब्द काढला नाही."

मुख्यमंत्री फडणवीसांनी यावेळी एक महत्त्वाचा तांत्रिक प्रश्न उपस्थित केला. ते म्हणाले, "अजित पवार अशी चर्चा करत होते, तर ते सरकारमधून बाहेर पडण्यासाठी करत होते का? मी यावर अनेक गोष्टी सांगू शकतो, पण सध्या मला त्यावर बोलायचे नाही."

सध्या अजित पवारांची राष्ट्रवादी महायुतीमध्ये सत्तेत आहे, तर शरद पवारांची राष्ट्रवादी विरोधात आहे. अशा स्थितीत विलीनीकरण झाले तर सत्तेचे समीकरण बदलू शकते, याकडेच मुख्यमंत्र्यांनी लक्ष वेधले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेतृत्वाबाबत बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, "सुनेत्रा वहिनींनी पक्षाचे नेतृत्व करावे हा त्यांचा अंतर्गत निर्णय आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने घेतलेल्या या निर्णयासोबत खंबीरपणे उभे राहणे हे महायुतीचा धर्म म्हणून आमचे काम आहे."

दरम्यान, अजित पवार गटाचे खासदार सुनील तटकरे यांनीही याआधी शरद पवार गटाचा दावा खोडून काढला आहे. "बारामती येथे झालेली बैठक ही विलीनीकरणासाठी नव्हती, तर केवळ जिल्हा परिषद निवडणुका एकत्र लढवण्याबाबत होती," असे सांगत त्यांनी शरद पवारांचा एकत्रीकरणाचा दावा फेटाळून लावला आहे. यामुळे दोन्ही बाजूंकडून परस्परविरोधी विधाने समोर येत आहेत.

दरम्यान, अजित पवार यांचा राष्ट्रवादी पक्ष सध्या भाजपा आणि शिंदे यांच्या शिवसेनेसोबत सत्तेत आहे. तर शरद पवार यांचा राष्ट्रवादी पक्ष विरोधी बाकावर आहे. त्यामुळे राष्ट्रवादीचे विलीनीकरण करायचे असेल तर शरद पवार यांच्या पक्षाला सत्तेत सहभागी व्हावे लागेल किंवा अजित पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षाला सत्तेतून बाहेर पडावे लागेल. असे असताना देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या पक्षाची भूमिका सांगितल्यानंतर आता पुढे काय होणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# शपथविधीनंतर मुख्यमंत्र्यांनी घेतली उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांची भेट

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ :
दिवंगत अजितदादा पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतल्यानंतर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांची भेट घेत नव्या राजकीय प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या. विशेष म्हणजे, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाठवलेले सांत्वनपर पत्र मुख्यमंत्र्यांनी वैयक्तिकरीत्या सुनेत्रा पवारांकडे सुपूर्द केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुनेत्रा पवार यांना पाठवलेल्या पत्रात त्यांचे सांत्वन केले आहे. "सुनेत्रा पवार महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री म्हणून राज्याच्या कल्याणासाठी अथक परिश्रम करतील. दिवंगत अजितदादा पवार यांचे अपूर्ण राहिलेले स्वप्न त्या निश्चितपणे पुढे नेतील," असा विश्वास पंतप्रधानांनी या पत्राद्वारे व्यक्त केला आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्वतः हे पत्र सुनेत्रा पवारांना देऊन त्यांचे सांत्वन केले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे २८ जानेवारी रोजी विमान अपघातामध्ये निधन झाले. अजित पवार खाजगी विमानाने सकाळी मुंबईहून बारामतीकडे रवाना झाले होते. यावेळी बारामती विमानतळावर लँडिंगदरम्यान विमान कोसळले आणि जळून खाक झाले. या दुर्घटनेत अजित पवारांसह 5 जणांचा मृत्यू झाला.

अजित पवारांच्या निधनाच्या चौथ्या दिवशी सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी सुनेत्रा पवार यांना उपमुख्यमंत्रिपदाची शपथ दिली. यासोबतच सुनेत्रा पवार यांना राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री होण्याचा मान मिळाला आहे. केवळ १० मिनिटांत पार पडलेल्या या शपथविधी सोहळ्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे देखील उपस्थित होते.

# अजितदादांचा तेरावा झाल्यावरच राजकीय चर्चा

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. १ :
राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या अकाली निधनानंतर महाराष्ट्राच्या राजकारणात अनेक घडामोडी घडत आहेत. विशेषतः राष्ट्रवादी पक्षात व पवार कुटुंबात देखील अनेक हालचाली सुरू असल्याचे दिसून येत आहे. परंतु, या सगळ्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार सावध भूमिका घेताना दिसत आहे. तसेच त्यांनी अजितदादांचा तेरावा होईपर्यंत कुठलेही राजकीय भाष्य करणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. रोहित पवार म्हणाले, अजितदादांची बातमी आपण ऐकली, बातमी खरी आहे का स्वप्न आहे हे आम्हालाही कळत नाही. आजपर्यंत आम्ही त्या दुःखात आहोत, त्या विमानात आणखी जे होते त्यांचाही परिवार दुःखात आहे. काही दिवसांपूर्वी कळ्ले की, दिंडोरी तालुक्यातील सुदाम बोडके हे अजित दादांचे आणि साहेबांचे कट्टर कार्यकर्ते आहेत. जेव्हा त्यांना अजित दादांच्या निधनाची बातमी कळ्ली, तेव्हा अस्वस्थ झाले नंतर ते हॉस्पिटलमध्ये गेले आणि हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचा मृत्यू झाला. आज पवार परिवार आणि हा परिवार दुःखात आहे. त्यामुळे मी बोडके कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले, असे रोहित पवार म्हणाले. पुढे बोलताना रोहित पवार म्हणाले, तेरावा ज्या दिवशी होईल, त्या दिवशी मी पत्रकार परिषद घेऊन सांगेल, आता राजकीय बोलणे योग्य नाही. दादांसोबत काय चर्चा झाली, सगळ्या प्रक्रियेत मी होतो. मात्र तेरा दिवसांनी सांगेल, असे त्यांनी म्हटले आहे. त्यामुळे व्हारल व्हिडिओमध्ये रोहित पवार आणि अजित पवारांचे काय बोलणे झाले, याबाबत त्यांनी बोलणे टाळले आहे. सुनेत्रा पवारांच्या शपथविधी संदर्भात विचारले असता रोहित पवारांनी परखड मत मांडले आहे. ते म्हणाले, अजित पवारांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष वेगळा आहे.



# अजितदादांचा अपघात की घातपात?

## ऐनवेळी पायलट का बदलले? पाच मृत्यू तर सहावी बॉडी कुठंय?- रुपाली पाटील ठोंबरे

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. १ :
अजित पवारांच्या विमान अपघाताच्या आदल्या दिवशी अनेक घडामोडी घडल्या, त्यामुळे त्यांच्या विमान अपघातामागे काही घातपात आहे का याची चौकशी करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या नेत्या रुपाली पाटील ठोंबरे यांनी केली आहे. तसेच अपघाताच्या दिवशी ऐनवेळी दोन्ही पायलट का बदलले असा सवालही ठोंबरे यांनी उपस्थित केला आहे.

रुपाली ठोंबरे म्हणाल्या, आज पाच दिवस झाले, आमचा मेंदू बधीर झाला आहे. अजित पवार सकाळी ८ वाजता ज्या विमानाने येणार होते, त्याचे पायलट आणि को पायलट दोघेही ट्रॅफिकमध्ये अडकले आणि ऐनवेळी बदलले गेले. ते का करण्यात आले? विमान खाली घेण्याची सूचना कोणी केली? आधी सहा माणसं या विमानात असल्याचे सांगितले गेले. मृत्यू पाच जणांचा झाला. मग सहावा माणूस कुठे गेला? असा प्रश्न ठोंबरे यांनी उपस्थित केला आहे.



पुढे बोलताना रुपाली पाटील ठोंबरे म्हणाल्या, लँडिंगच्या वेळी अडचण असताना ते विमान खाली घेण्याची सूचना कोणी दिली? अडचण असेल तर ते विमान पुणे, सोलापूर किंवा इतर ठिकाणी उतरवायला हवे होते. मात्र तसे न करता बारामतीमध्येच का उतरवले? विमान अपघातात सगळ्या बॉडी जळाल्या, पण कागदपत्रे तशीच राहिली. त्यामुळे हा अपघात आहे की त्यामागे काही कटकारस्थान आहे, याची चौकशी झालीच पाहिजे. आपण हा अपघात असल्याचे म्हणू आणि दुसरीकडे ज्याने हे कटकारस्थान केले आहे तो मोकाट सुटायला नको. दरम्यान, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताला पाच दिवस उलटले असतानाच, राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार आणि अजित पवारांचे कट्टर समर्थक अमोल मिटकरी यांनी उपस्थित केलेल्या पाच प्रश्नांनी संपूर्ण राज्याच्या राजकीय वतुर्ळात मोठी खळबळ उडवून दिली आहे. दादा गेले हे मन मान्य करायला तयार नाही. मृत्यूचे राजकारण करण्याचे पाप मी करणार नाही, पण प्रश्नांचा आगडोंब उसळतोय, असे म्हणत अमोल मिटकरींनी थेट अपघाताच्या ठिकाणच्या विसंगतींवर आणि तपास यंत्रणांच्या माहितीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले

# लाडक्या बहिणींना २१०० रुपये देणार

■ वृत्तसंस्था, कोल्हापूर, दि. १ :
एकनाथ शिंदे हा शब्दाचा पक्का आहे, लाडक्या बहिणींना लखपती केल्याशिवाय थांबणार नाही. लवकरच आम्ही लाडक्या बहिणींना 2100 रुपये देणार, असे विधान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले आहे. कोल्हापूरच्या कागल येथे एका जाहीर सभेत ते बोलत होते. ज्या उमेदवाराच्या मागे महिला, त्याचा मत पेटीत नंबर पहिला. त्यामुळे दर महिन्याला ओवाळणी देणारा हा भाऊ आज विनंती करायला आला असल्याचे यावेळी एकनाथ शिंदे म्हणाले.

आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीच्या अनुषंगाने प्रचार सुरू झाल्या आहेत. एकनाथ शिंदे हे आज कोल्हापूर दौ?्यावर असून यावेळी बोलताना त्यांनी सुरुवातील दिवंगत अजित पवारांना अभिवादन केले. ते म्हणाले, अशा दुःखात देखील आम्हाला प्रचाराला यावे लागत आहे. या निवडणुका लढवय्या कार्यकर्त्यांच्या असतात, त्या पुढे ढकलता येत नाहीत. आम्ही प्रचार साधेपणाने करतो, कोणाच्या भावना दुखावणार नाहीत याची काळजी घेतो, असे शिंदे म्हणाले.

पुढे बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, कोल्हापूरच्या मातीला एक वेगळा सुगंध आहे. संजय मंडलिक तुम्ही एकटे नाहीत, ही जनता तुमच्या सोबत आहे. काही लोक स्वतःच्या स्वार्थासाठी एकत्र आली आहेत. ही लढाई जनशक्ती विरुद्ध धनशक्ती अशीह आहे आणि या लढाईत नेहमी जनशक्ती जिंकते. सत्तेसाठी एकत्र आला असला तरी जनता ठरवते कोणाला आपले मत द्यायचे, असे म्हणत त्यांनी विरोधकांवर निशाणा साधला.



लाडकी बहीण योजनेविषयी बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, लाडक्या बहिणींना लखपती केल्याशिवाय एकनाथ शिंदे थांबणार नाही. दर महिन्याला ओवाळणी देणारा हा भाऊ आज विनंती करायला आला आहे. लाडक्या बहिणींना आम्ही लवकरच 2100 रुपये देणार आहोत, असे आश्वासन एकनाथ शिंदे यांनी यावेळी दिले आहे.

तसेच जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणूक ही पक्षाची पाया रचणारी निवडणूक आहे. मी आज नेहमी सारखे भारण करणार नाही. केवळ कार्यकर्त्यांच्या आग्रहाखातर प्रचाराला आलो आहे, असे एकनाथ शिंदेंनी स्पष्ट केले.

नगरपरिषद आणि महानगरपालिका पालिका निवडणुकीत शिवसेना राज्यात दुसऱ्या नंबरचा पक्ष राहिला आहे. कोल्हापूर जिल्ह्यात शिवसेनेचे 5 आमदार आहेत आणि एक खासदार आहे. संजय मंडलिक गेल्या वेळी थोडक्यात सुटले, पुढच्या वेळी नक्की बरोबर पकडतील असा विश्वासही एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला आहे.

# आम्ही एनडीएसोबतच राहणार आहोत

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १ :
आम्ही एनडीएसोबतच राहणार आहोत आणि सोबतच पुढे जाणार असल्याचे विधान अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी केले आहे. अजित पवारांच्या निधनानंतर अनेक घडामोडी घडल्या, त्यात आता दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्र येणार असल्याच्या चर्चा सुरू झाल्या आहेत. यावर सुनील तटकरे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

पत्रकारांशी बोलताना सुनील तटकरे म्हणाले, आमची भूमिका स्वच्छ आहे. आम्ही दादांच्या परिवाराशी आणि दादांनी राष्ट्रवादी काँग्रेसचा जो परिवार उभा केला त्याच्याशी सुसंगत असा निर्णय करत आहोत. राष्ट्रवादी पक्षाचा विधिमंडळाचा नेता कोण निवडायचा हा राष्ट्रवादीचा अधिकार आहे. तसेच विलीनीकरणाच्या संदर्भात मी अनेकवेळा स्पष्ट केले आहे की एनडीएच्या सोबत आम्ही आहोत, एनडीएच्या सोबत आम्ही कायम सोबत राहणार आहोत. दादा असताना सुद्धा मी हे वक्तव्य केले आहे आणि हे सर्वज्ञात आहे, असे तटकरे यांनी म्हटले आहे.



राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाच्या संदर्भात बोलताना मंत्री माणिकराव कोकाटे यांनी देखील प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले, विलीनीकरणाच्या संदर्भात मीडिया का चर्चा करत आहे? हा विषय कौटुंबिक विषय आहे. तसेच कुटुंबात आमचे वहिनीशी किंवा कोणाशीही आमचे बोलणे झाले नाही. मर्जरमध्ये काय अटी शर्थी आहेत याविषयी देखील आमची काही चर्चा झालेली नाही. आमची जोपर्यंत बैठक होत नाही, पवार कुटुंबाशी आमची चर्चा होत नाही, तोपर्यंत यावर बोलणे योग्य नसल्याचे मत कोकाटे यांनी व्यक्त केले आहे.

# दुचाकीस्वाराकडून पोलिस कर्मचाऱ्याला मारहाण

■ वृत्तसंस्था, हिंगोली, दि. १ :
हिंगोली शहरात महात्मा गांधी चौक भागात दुचाकी वाहनावर कारवाई करण्याच्या कारणावरून वाहतुक शाखेच्या पोलिस कर्मचाऱ्यास मारहाण झाल्याची घटना घडली आहे. पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले आहे.

हिंगोली शहरातील वाहतुक व्यवस्थेला वळण लावण्यासाठी शहर वाहतूक शाखेने वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर कारवाईची मोहिम हाती घेतली आहे. वाहतूक शाखेचे निरीक्षक शरद मरे यांनी शहरातील वर्दळीच्या ठिकाणी तसेच सार्वजनिक चौकात वाहतूक शाखेचे कर्मचारी नियुक्त केले असून वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई केली जात आहे. या शिवाय विना नंबर प्लेट, वाहन चालविण्याचा परवाना नसणाऱ्यांवरही कारवाई केली जात आहे. दरम्यान, वाहतुक शाखेचे कर्मचारी शशीकांत भिसे हे शनिवारी ता. ३१ सायंकाळी सहा वाजता शहरातील महात्मा गांधी चौकात कर्तव्यावर हजर होते. यावेळी एका विना क्रमांकाच्या दुचाकी वाहनावर असलेला शेख अतीक हा येणाऱ्या जाणाऱ्यांना शिवीगाळ करीत असल्याचे दिसून आले.

# पार्थ पवारांना खासदार करू नका त्यांच्यावर गुन्हा दाखल करा

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. १ :
सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी पुणे भूखंड घोटाळ्याप्रकरणी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सुपुत्र पार्थ पवार यांच्यावर तत्काळ गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. अजित पवारांच्या निधनानंतर अवघ्या 3 दिवसांत शपथविधी घ्यायला हरकत नसेल, तर पुणे भूखंड घोटाळ्याची चौकशीही थांबवायची नाही, असे त्या म्हणाल्यात. धनंजय मुंडेंसारखा संधीसाधू माणूस सुनेत्रा पवारांच्या मागेपुढे फिरताना दिसल्याची बाबही त्यांनी यावेळी निदर्शनास आणून दिली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे गत बुधवारी विमान अपघातात निधन झाले. त्यांच्या निधनानंतर अवघ्या 3 दिवसांतच त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची सूत्रे हाती घेतली. या प्रकरणी सकारात्मक व नकारात्मक या दोन्ही प्रकारच्या चर्चा होताना दिसून येत आहेत. या पार्श्वभूमीवर अंजली दमानिया यांनी पार्थ पवार यांच्यावर तत्काळ गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. त्या रविवारी एका पोस्टमध्ये म्हणाल्या, अजित पवारांच्या निधनानंतर अवघ्या ३ दिवसांत शपथविधी घ्यायला काहीच हरकत नसेल आणि बिझनेस अज यूज्युअल असेल, तर पुणे जमीन घोटाळ्याची चौकशीही थांबवायची नाही.



# भाजपला काल 'घराणेशाही'च्या आरोपातून मोक्ष मिळाला

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १ :
महाराष्ट्राच्या राजकारणात उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचा शपथविधी पार पडल्यानंतर शिवसेना (ठाकरे गट) खासदार संजय राऊत यांनी भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या सद्यस्थितीवर जोरदार प्रहार केला आहे. "घराणेशाहीवरून इतरांवर चिखलफेक करणाऱ्या भाजपला सुनेत्रा पवारांच्या निवडीनंतर काल 'मोक्ष' प्राप्त झाला," असा खोचक टोला राऊतांनी लगावला. तसेच, राष्ट्रवादीचे नेतृत्व पुन्हा 'पटेलां'कडे (प्रफुल्ल पटेल) जाऊ नये, अशी काळजी सुनेत्रा पवारांनी घ्यावी, असा सल्लाही त्यांनी यावेळी दिला.



संजय राऊत म्हणाले की, अमित शहा आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी महाराष्ट्रात आले की सातत्याने ठाकरेंच्या आणि गांधींच्या घराणेशाहीवर टीका करतात. मात्र, सुनेत्रा पवारांचे अभिनंदन करून त्यांनी स्वतःला या आरोपातून मुक्त केले आहे. "भाजपने आता घराणेशाहीवर बोलण्याचा नैतिक अधिकार गमावला आहे, काल त्यांना या आरोपातून मोक्ष मिळाला," असे संजय राऊत म्हणाले.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी काल केलेल्या विधानाचा संदर्भ देत राऊत म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेस हा रांगड्या माणसांचा आणि मराठी अस्मितेचा पक्ष आहे. "अजित पवारांनी महाराष्ट्राच्या अस्मितेबाबत कधीही तडजोड केली नाही. ते भाजपच्या ताटाखालचे मांजर होणे अनेकदा टाळत होते. हा पक्ष पाटील आणि भोसल्यांचा आहे, तो पटेलांचा होऊ देऊ नका. सत्तेची सूत्रे मराठी चेहऱ्याकडेच राहावीत याची काळजी सुनेत्रा पवारांनी घेणे गरजेचे आहे."

अजित पवारांच्या मुख्यमंत्रीपदाच्या महत्त्वाकांक्षेवर भाष्य करताना राऊत म्हणाले की, "जर शरद पवारांच्या मनात असते, तर अजित पवार नक्कीच मुख्यमंत्री झाले असते. पण तेव्हाची राजकीय परिस्थिती वेगळी होती. शरद पवार कधीही राजकारण ताणून धरत नाहीत, ते संयमाची भूमिका घेतात.

# रोहित पवारांकडून पिंकी माळीच्या कुटुंबियांचे सांत्वन

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १ :
बारामती येथील भीषण विमान अपघातात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह प्राण गमावलेल्या क्रू-मेंबर पिंकी माळी यांच्या मुंबईतील निवासस्थानी आमदार रोहित पवार यांनी भेट देऊन त्यांचे सांत्वन केले. एका टॅक्सी चालकाने अत्यंत कष्टाने, स्वतःचे घर विकून आपल्या मुलीला मोठे केले आणि ती मुलगी घराचा आधार होत असतानाच काळाने झडप घातली, हे पाहून मन सुन्न झाल्याची भावना रोहित पवार यांनी यावेळी व्यक्त केली. तसेच रोहित पवार यांनी मृत क्रू-मेंबरच्या भावाच्या करिअरची जबाबदारी स्वीकारली.

पिंकी माळी यांचे वडील मुंबईत टॅक्सी चालवून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. रोहित पवार यांनी पिंकीच्या संघर्षाचा उल्लेख करताना सांगितले की, "पिंकीला उच्च शिक्षण मिळावे यासाठी तिच्या वडिलांनी आपले राहते घर विकले होते. पिंकीनेही अनेक नामांकित कंपन्यांमध्ये काम करून वडिलांच्या कष्टाचे चीज केले. ज्यावेळी घराची परिस्थिती सुधारू लागली होती, नेमक्या त्याच वेळी ही दुर्दैवी घटना घडली. एका कष्टकरी बापाने आपल्या मुलीसाठी केलेले बलिदान आणि त्यानंतर ओढवलेला हा प्रसंग अत्यंत हृदयद्रावक आहे." पिंकी माळी यांचा भाऊ सध्या शिक्षण घेत आहे. आपल्या भावाने 'कॅप्टन' बनावे अशी पिंकीची इच्छा होती. "पिंकीच्या भावाची शिक्षणाची जिद्द पाहून आणि कुटुंबाची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता, त्याला योग्य नोकरी मिळवून देण्यासाठी मी पूर्ण ताकदीने प्रयत्न करेन," असे आश्वासन रोहित पवार यांनी दिले. या कठीण काळात संपूर्ण पवार कुटुंब माळी परिवाराच्या पाठीशी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



### अवैध सावकारीत गुंतलेल्या छोट्या बागडबिल्ल्याच्या संपत्तीची चौकशी करण्यात यावी

# किशोर कऱ्हाडेंची मागणी

■ महासागर प्रतिनिधी
देसाईगंज, दि. १ :
कोणे एकेकाळी एकवेळच्या खाण्याचे वांदे असलेल्या देसाईगंज शहरातील छोटा बागडबिल्ला या नावाने प्रसिद्ध असलेल्या व गडचिरोली जिल्ह्यातील सिएमआर मिलींग गैरव्यवहार प्रकरणातील मास्टरमाईंड असलेल्या व्यक्तीने आधी बाजारात नकली नोटं चालवून व अवैध सावकारीच्या माध्यमातून तसेच सिएमआर मिलींग गैरव्यवहारात स्थानिक अधिकाऱ्यांना हाताशी धरून अल्पावधित कोट्यावधिची संपत्ती अर्जीत करणाऱ्या 'मायाप्रेमी'च्या संपुर्ण संपत्तीची चौकशी करून दोषी आढळून आल्यास कायदेशीर कारवाई करण्याची मागणी देसाईगंज सिटीझन फोरमचे अध्यक्ष किशोर कऱ्हाडे यांनी संबंधित विभागाकडे सबळ पुराव्याच्या आधारे केली असल्याने शहरात चांगलीच खळबळ माजली आहे.

दिलेल्या तक्रारीत कऱ्हाडे यांनी नमूद केले आहे की, देसाईगंज शहरातील कथित राईसमिलर्सकडे एक वेळच्या खाण्याचे वांदे असतांना आरमोरी येथील एका सावकाराकडून एक टक्के व्याज दराने रक्कम आणुन देसाईगंज शहरातील गरजुंना तीन टक्के व्याजाने देऊन येत असलेल्या रकमेतून कडधान्य खरेदीचा व्यवसाय करीत होता. दरम्यान कडधान्य विकण्यासाठी आणणाऱ्या एका शेतकऱ्याला नकली नोटं दिल्याचे तो शेतकरी मिरची बाजारात मिरच्या खरेदी करण्यासाठी गेला असता नकली नोटा दिल्याचे बिंग फुटले होते. दरम्यान प्रकरण चव्हाट्यावर येऊ नये करीता लागलीच सारवासारव करून प्रकरण दाबुन टाकण्यात आले होते. यावरून सदर छोटा बागडबिल्ल्याने नकली नोटं चालवून व अवैध सावकारकीच्या माध्यमातून कोट्यावधीची माया अर्जीत करून अल्पावधित कोट्यावधिचा देसाईगंज- ब्रम्हपुरी मार्गावर बंगला बांधला आहे.

# अजित पवारांच्या नावाने संभाजीनगरमध्ये क्रीडा संकुल उभारणार

■ वृत्तसंस्था,
छत्रपती संभाजीनगर, दि. १ :
छत्रपती संभाजीनगर येथे महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचे अध्यक्ष आणि माजी उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. या शोकसभेत राज्याचे कॅबिनेट मंत्री अतुल सावे यांनी अजित पवार यांच्या नावाने छत्रपती संभाजीनगरमध्ये भव्य क्रीडा संकुल उभारण्याची घोषणा केली.



मंत्री अतुल सावे, जे महाराष्ट्र हँडबॉल असोसिएशनचे अध्यक्षही आहेत, यांनी अजित पवार यांच्या क्रीडा क्षेत्रातील योगदानाचे कौतुक केले. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ हे आधुनिक व सर्वसुविधायुक्त क्रीडा संकुल उभारले जाईल, असे त्यांनी सांगितले. या घोषणेमुळे क्रीडा क्षेत्रात सकारात्मक प्रतिसाद उमटला. या शोकसभेला महाराष्ट्र ॲथलेटिक्स असोसिएशनचे कार्याध्यक्ष श्रीकांत जोशी, महाराष्ट्र कबड्डी असोसिएशनचे माजी अध्यक्ष किशोर पाटील, महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या शिखर समितीचे अध्यक्ष सचिन मुळे, महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचे सहसचिव डॉ. उदय डोंगरे आणि छत्रपती संभाजीनगर ऑलिम्पिक असोसिएशनचे अध्यक्ष पंकज भारसाखळे उपस्थित होते. त्यांनी अजित पवार यांच्यासोबतच्या आठवणींना उजाळा दिला.

## अतुल सावे यांची घोषणा

शोकसभेच्या यशस्वी आयोजनात छत्रपती संभाजीनगर ऑलिम्पिक असोसिएशन आणि संलग्न विविध क्रीडा संघटनांचे पदाधिकारी व सदस्यांनी सक्रिय सहभाग घेतला. यामध्ये कबड्डी, टेनिकॉइट, खो-खो, क्रीडा शिक्षक संघटना, क्रीडा-भारती, क्रिकेट अंपायर, सॉफ्टबॉल, तलवारबाजी, हॉकी, बॉक्सिंग, ड्रॉप रो बॉल, वॉलीबॉल, हँडबॉल, बेसबॉल, ॲथलेटिक्स संघटनांचे प्रतिनिधी तसेच सैनिकी शाळेचे प्राध्यापक, क्रीडा उपसंचालक कार्यालयातील अधिकारी, शिवछत्रपती पुरस्कार विजेते आणि क्रीडा मार्गदर्शक उपस्थित होते.

यावेळी क्रीडा क्षेत्राच्या वतीने दिवंगत अजित पवार यांना सामूहिक श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. मोठ्या संख्येने खेळाडू, शिवछत्रपती पुरस्कार विजेते, क्रीडा प्रशिक्षक आणि क्रीडाप्रेमी नागरिक शोकसभेला उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांनी अजित पवार यांचे महाराष्ट्रातील क्रीडा चळवळीला दिलेले योगदान कायम स्मरणात राहील, अशी भावना व्यक्त केली.

महासागर

●सोमवार,दि.२ फेब्रुवारी २०२६



## जिल्हाधिकारी कार्यालयात आज लोकशाहीदिन

■अकोला,दि.१ (प्रतिनिधी)■

लोकशाहीदिन व दिव्यांग लोकशाहीदिन जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या अध्यक्षतेत सोमवार, दि. २ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वा. होणार आहे. दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाहीदिन व दिव्यांग लोकशाहीदिनाचे आयोजन करण्यात येते. संबंधित विभागांनी अनुपालन अहवाल आधीच सादर करून बैठकीला वेळेवर उपस्थित राहावे, असे निर्देश विभागप्रमुखांना देण्यात आले आहेत.

## २०२६ च्या बजेटमध्ये दिव्यांगांसाठी सकारात्मक बाबींचा समावेश: डॉ विशाल कोरडे



**अकोला:** स्थानिक दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोला च्या माध्यमाने डॉ.विशाल कोरडे संपूर्ण भारतभर दिव्यांग शिक्षण, रोजगार व आरोग्यासाठी आपले अनमोल योगदान देत आहेत . १ फेब्रुवारी २०२६ रोजी संसदेत अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी अर्थसंकल्प सादर केला . दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोलाचे संस्थापक अध्यक्ष व श्री शिवाजी महाविद्यालय अकोला चे सहयोगी प्राध्यापक डॉ.विशाल कोरडे यांनी अर्थसंकल्प २०२६ मध्ये दिव्यांग बांधवांसाठी घोषित केलेल्या योजनांचे स्वागत केले आहे . दिव्यांग कौशल योजना , दिव्यांग सहारा योजना व प्रधानमंत्री दिव्यांग केंद्राला सहयोग अशा महत्त्वपूर्ण बाबी या अर्थसंकल्पात मांडल्या आहेत . या योजनांच्या माध्यमाने दिव्यांग बांधवांसाठी सहज व सुलभतेने संपूर्ण भारतात कार्य करण्यासाठी वातावरण निर्मिती व्हावी , दिव्यांग बांधवांना कृत्रिम अंग मिळावेत यासाठी अङचखउज संस्थेच्या माध्यमाने नवीन कृत्रिम अंग व सहाय्यक उपकरणाची निर्मिती करणे व अशी सहायक उपकरणे मिळण्यासाठी विविध केंद्रांची निर्मिती करणे ज्या द्वारा दिव्यांग बांधव त्याचा लाभ घेऊ शकतील . ह्या सर्व सकारात्मक गोष्टी असल्या तरीही वास्तवात दिव्यांग बांधवापर्यंत शासकीय योजना लवकर पोहोचत नाहीत असा खेद सुद्धा डॉ.कोरडे यांनी व्यक्त केला . तळागाळातील दिव्यांग बांधवांपर्यंत या योजना पोहोचविण्यासाठी दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोला सारख्या एन जी ओ सोबत प्रशासनाने सामंजस्य करार करून कार्य करण्याची गरज असल्याचे मतही डॉ.विशाल कोरडे यांनी व्यक्त केले . ज्या दिव्यांगांना विविध योजनांची माहिती मिळवून घ्यायची आहे त्यांनी संस्थेच्या ९४२३६५००९० या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधावा असे आव्हान दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोला तर्फे करण्यात आले आहे .

## थोडक्यात

### महानगरपालिकेत 'लोकशाही दिन'



**अकोला :** शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आणि मनपा आयुक्त डॉ. सुनील लहाने यांच्या आदेशान्वये, अकोला महानगरपालिकेत सोमवार, २ फेब्रुवारी २०२६ रोजी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. हा उपक्रम आयुक्त कार्यालयात दुपारी ४ ते ६ या वेळेत पार पडणार आहे. नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी आणि प्रशासकीय कामात पारदर्शकता आणण्यासाठी या दिनाचे विशेष महत्त्व आहे. या दिवशी आयुक्त डॉ. सुनील लहाने स्वतः उपस्थित राहून नागरिकांच्या समस्या जाणून घेणार आहेत. संबंधित विभागातील प्रलंबित प्रश्न निकाली काढण्यासाठी या व्यासपीठाचा उपयोग करण्याचे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे. मनपा क्षेत्रातील नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा.

### शहरात कचरा संकलनाचा बोजवारा

**अकोला :** शहरातील कचरा व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यासाठी १ सप्टेंबरपासून कचरा संकलनाचे काम खासगी ठेकेदाराला सोपवण्यात आले खरे, मात्र महिना उलटूनही अद्याप कचरा संकलनाची घडी बसलेली नाही. महापालिकेने १०० घंटागाड्या सुपूर्द करूनही ठेकेदाराकडून दैनंदिन कचरा संकलनाला फाटा दिला जात असल्याने शहरात अस्वच्छतेचे साम्राज्य पसरले आहे. नागपूर येथील अर्बन एनवायरो वेस्ट मॅनेजमेंट लिमिटेड या कंपनीला तो शहरातील डोअर टू डोअर कचरा संकलनाचे कंत्राट देण्यात आले आहे. नियमानुसार, ठेकेदाराने दररोज १८० ते २०० मॅट्रिक टन कचरा उचलून नायगाव येथील ट्रान्सफर स्टेशनवर पोहोचवणे बंधनकारक आहे. मात्र, प्रत्यक्षात शहराच्या अनेक भागांत तीन ते चार दिवसांनंतर घंटागाडी येत असल्याची स्थिती आहे. यामुळे नाईलाजाने नागरिकांना उघड्यावर कचरा टाकावा लागत आरोग्याचा प्रश्न गंभीर होत आहे.

### अखेर २१ कोटींचा आमदार निधी प्राप्त

**अकोला :** सन २०२५ २६ हे आर्थिक वर्ष संपण्यासाठी दोन महिन्यांचा कलावधी राहिला असतानाच आमदारांना त्यांच्या म तदारसरघातील विकास कामांसाठी मिळणारा एकूण २१ कोटींचा आमदार निधी प्राप्त झाला आहे. सुमारे २४ कोटींपेक्षा जास्त कामांना प्रशासकीय मंजूरी देण्यात आली आहे. निधी मंजूर झाल्याने आता मान्यता दिलेली कामे तातडीने पूर्ण करण्याचे आव्हान सरकारी यंत्रणांपुढे उभे ठाकले आहे. आतापर्यंत वकास निधीच नसल्याने विशेषतः विरोधी पक्षातील आमदारांच्या समथकांची कोंडी झाली होती. सत्ताधारी पक्षातील कार्यकत्यांना तरी विशेष निधी मिळत असल्याने त्यांच्या भागात कामे होत आहेत. मात्र विरोधक निधीपासून वंचित होते. मुख्यमंत्री लाडकी बहीणसह अन्य उपक्रमांमुळे तिजोरीत खडखडाट असल्याने शासनाकडून निधी वितरण करताना हात आखडता घेण्यात येत असल्याचे अर्थतज्ज्ञांचे मत आहे. विधानसभा मतदारसंघातील छोटी-मोठी विकास कामे करता यावीत, यासाठी प्रत्येक आमदाराला शासनाकडून दर वर्षी निधी उपलब्ध करून देण्यात येतो. हा निधी ५ कोटी असतो.

## अर्थसंकल्पातील 'विकसित भारत ' हा केवळ संकल्प नसून कोट्यवधी कामगार आणि सामान्यांच्या प्रगतीचा मार्ग

### कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर



■अकोला,दि.१ (प्रतिनिधी)■

देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने गेल्या १२ वर्षांपासून सुरू ठेवलेल्या नियोजनबद्ध विकासामुळे आज भारताची अर्थव्यवस्था जगासाठी एक आशेचा किरण ठरली आहे. केंद्रीय वित्त मंत्री निर्मला सीतारामन यांनी मांडलेला आजचा अर्थसंकल्प हा केवळ आकड्यांचा खेळ नसून, तो देशातील गरीब, शेतकरी आणि कष्टकरी कामगारांचे जीवनमान उंचावणारा ठरणारा आहे, अशी भावना राज्याचे कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी व्यक्त केली आहे.

कामगार कामगार मंत्री श्री फुंडकर म्हणाले, राज्यातील पायाभूत सोयी सुविधांसाठी अर्थसंकल्पात दिलेल्या भरीव निधीमुळे राज्यातील ' इन्फ्रास्ट्रक्चर' जागतिक स्तराचे होण्यास मदत मिळणार आहे. देशांतर्गत उत्पादनावर दिलेला भर आणि सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांसाठी केलेली १० हजार कोटी रुपयांची भरीव तरतूद ही देशातील औद्योगिक क्रांतीला नवी दिशा देणारी आहे. वस्त्रोद्योग क्लस्टरच्या विकासामुळे आणि खनिज कॉरिडॉरमुळे मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतील, ज्याचा सर्वाधिक फायदा तरुण कामगार वर्गाला होईल.सामान्य नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेत सरकारने कॅन्सर आणि मधुमेहाची औषधे स्वस्त करण्याचा घेतलेला निर्णय अत्यंत दिलासादायक आहे. तसेच, बायोफार्मा उत्पादनासाठी १० हजार कोटींची तरतूद करून भारताला या क्षेत्राचे जागतिक 'हब' बनवण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. यामुळे आरोग्य सुविधा अधिक सक्षम आणि परवडणाऱ्या होतील, असेही काम गार मंत्री यांनी नमूद केले आहे. ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या खादी आणि हातमाग क्षेत्रासाठी 'महात्मा गांधी ग्रामस्वराज' अभियान ही क्रांती असल्याचे सांगत कामगार मंत्री म्हणाले, हातमाग उत्पादनात वाढ झाल्यामुळे ग्राम ीण कारागिरांच्या कौशल्याला जागतिक बाजारपेठ मिळेल आणि त्यांचे आर्थिक उत्पन्न वाढण्यास मदत होईल. कृषी क्षेत्रात उत्पादकता वाढवण्यावर दिलेला भर आणि ४ राज्यांमध्ये प्रस्तावित असलेले खनिज कॉरिडॉर हे भारताच्या सर्वांगीण विकासाचे निदर्शक आहेत. आर्थिक विकास दरात सातत्याने वाढ करणे हे आमचे पहिले कर्तव्य असून सरकार त्या दृष्टीने ठोस पावले उचलत आहे.

## बजेट २०२६-२७ देशाच्या भविष्यास दिशा देणारा : जावेद जकरिया

■अकोला,दि.१ (प्रतिनिधी)■

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी संसदेत सादर केलेला सन २०२६-२७ चा केंद्रीय अर्थसंकल्प हा देशातील गाव, गरीब, शेतकरी आणि युवकांचे भविष्य लक्षात घेऊन तयार केलेला सकारात्मक व दूरदृष्टीपूर्ण अर्थसंकल्प आहे. शेती व संलग्न क्षेत्रांसाठी १,६२,६७१ कोटी तसेच ग्रामीण विकासासाठी २,७३,१०८ कोटींची तरतूद करून सरकारने गावांना विकासाचा मुख्य आधारस्तंभ बनवण्याच्या दिशेने ठोस पावले उचलली आहेत, हे स्पष्ट केले आहे.शेतकऱ्यांना आत्मनिर्भर बनवणे, शेतीचा सर्वांगीण विकास करणे आणि ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट करण्यासाठी करण्यात आलेल्या तरतुदी निश्चितच कौतुकास्पद आहेत. तसेच उच्च शिक्षणासाठी, एसटीईएम संस्थांमध्ये मुलींसाठी प्रत्येक जिल्ह्यात वसतिगृहांची उभारणी, १५,००० माध्यमिक शाळा व ५०० महाविद्यालयांम ध्ये कंटेंट क्रिएटर लॅब्सची स्थापना, ७ हायस्पीड रेल्वे कॉरिडॉर, तसेच अत्यावश्यक औषधांवर सीम ाशुल्कात सूट देण्यासारखे निर्णय देशाच्या प्रगतीला नवी गती देतील.हा अर्थसंकल्प केवळ सध्याच्या गरजा पूर्ण करणारा नसून, देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी भक्कम पाया घालणारा आहे. एकूणच हा अर्थसंकल्प भारताला विकास, आत्मनिर्भरता आणि सर्वसमावेशक प्रगतीच्या दिशेने नेणारा एक चांगला व संतुलित अर्थसंकल्प आहे.

## कास्तकार व कृषी विकासासाठी महाराष्ट्र शेतकरी संघटना कटिबद्ध:पूर्णाजी खोडके



■अकोला,दि.१ (प्रतिनिधी)■

राज्यातील शेतकरी, शेतमजूर तथा ग्रामीण भागातील सर्वसामान्य जनतेच्या कृषीविषयक ज्वलंत प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी कार्यान्वित होत असलेली नियोजित महाराष्ट्र शेतकरी संघटना कटीबद्ध असून प्रत्येक जिल्ह्यात यात शेतकरी विश्वातील नव्या दमाचे शिलेदार नेमणार असून या नव्या महाराष्ट्र शेतकरी संघटनेत शेतकरी, शेतमजूर व युवा विश्वाने सहभागी व्हावे असे आवाहन महाराष्ट्र शेतकरी संघटनेचे अध्यक्ष पूर्णाजी खोडके यांनी केले. रविवारी शासकीय विश्रामगृहात महाराष्ट्र शेतकरी संघटनेच्या ध्येयधोरण व आगामी कार्यक्रमाची माहिती देण्यासाठी पत्रकार परिषद संपन्न झाली.यावेळी नूतन सचिव सुगत भटकर उपस्थित होते. सरकार हे कास्तकार हे शेतम जुरांच्या समस्या सोडण्यासाठी व कृषी क्षेत्राचा साचेबद्ध विकास साधण्यासाठी कुचकामी ठरले असून शेतकऱ्यांची आर्थिक सामाजिक व शैक्षणिक पिळवणूक जोमाने होत आहे. यावर राज्यभरात संघटना रान उठवणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.महाराष्ट्र शेतकरी संघटना शेतकऱ्यांच्या सर्व समस्या सोडण्यासाठी प्रयत्न करणार असून कास्तकारांच्या आर्थिक व शैक्षणिक प्रगतीसाठी विविध उपक्रम राबवणार आहे.

## अकोल्यात 'महानिर्यात परिषद' ; उद्योजकांसाठी सुवर्णसंधी

■अकोला,दि.१ (प्रतिनिधी)■

राज्याच्या आर्थिक विकासात लघु, सूक्ष्म उद्योग क्षेत्राचे योगदान वाढवण्यासाठी आणि निर्यातक्षम उद्योगांना चालना देण्यासाठी जिल्हा उद्योग केंद्रातर्फे अकोल्यात 'महानिर्यात परिषद २०२६' जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या अध्यक्षतेत आज सोमवार, दि. २ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता हॉटेल आर.जी. एक्सक्लुझिव्ह येथे होणार आहे.

या कार्यक्रमात व्यवसाय सुलभीकरणासाठी 'मैत्री विभाग' , निर्यातीसाठी, भांडवलासाठी व इतर बाबींसाठी आयडीबीआय, सिडबी यासारख्या संस्थांचे तज्ज्ञ मार्गदर्शन करतील.

विशेष उपस्थिती: कृषी व खाद्य उत्पादने निर्यातीसाठी अपेडा आणि उत्पादनांच्या विम्यासाठी एनआयए अशा विविध संस्थांचे प्रतिनिधी आणि यशस्वी उद्योजक यावेळी उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. विकास आयुक्त (उद्योग) यांच्या मार्गदर्शनात परिषद आयोजित करण्यात आली आहे. अकोला जिल्ह्यातील सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम घटक, निर्यातदार, नवउद्योजक, औद्योगिक संस्था, शेतकरी सहकारी संस्था आणि बँकांचे प्रतिनिधी यांनी या कार्यशाळेला उपस्थित राहावे.

असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक संतोष बनसोड यांनी केले आहे.उद्योजकांना आपल्या उत्पादनांना जागतिक बाजारपेठ मिळवून देण्यासाठी आणि विविध शासकीय योजनांचा लाभ एकाच छताखाली घेण्यासाठी ही कार्यशाळा अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे.

## शहरातील बहूतांश रस्ते अंधारात

**अकोला :** शहरातील अनेक मार्गांवरील पथदिवे बंद असल्या मूळे बहूतांश रस्ते अंधारात बुडाले आहेत.विशेषतः नेहरू पार्क चौक ते पोलिसअधीक्षक कार्यालय, सिंधी कॅम्प तेकौलखेड मार्गावर पथदिवे सुरू राहतनसल्यामुळे सर्वत्र अंधाराचे साम्राज्यपसरले असते. गत तीन- चारमहिन्यांपासून हे पथदिवे बंद आहेत.

## प्रशांत तायडे ने पुणे ते बेलखेड तेल्हारा सायकलने ५२० कि.मी.ची मोहीम ३ दिवसात यशस्वीरीत्या केली पूर्ण

■तेल्हारा,दि.१ (प्रतिनिधी)■



बेलखेड च्या प्रशांत तायडे ने पुणे ते बेलखेड (तेल्हारा) सायकल ५२० कि. मी. सायकल मोहीम ३ दिवसात यशस्वीरीत्या पूर्ण केली, या मोहिमे दरम्यान प्रशांत सोबत इंडो ॲथलेटिक सोसायटीच्या ६ सायकलपटूं मित्रब पुणे ते शेगाव ४८० कि.मी. सोबत होते. ही सायकल मोहीम शनिवार, २३ जानेवारी २०२६ रोजी पहाटे ४ वाजता जुना मुंबई-पुणे महामार्गावरील नाशिक फाटा येथून सुरू झाली. या वेळी अध्यक्ष इंडो ॲथलेटिक सोसायटी श्री. गजानन खैरे यांच्या हस्ते झेंडा दाखवण्यात आला. याप्रसंगी संस्थापक सदस्य श्री. गणेश भुजबळ, श्री. रमेश माने, श्री. संतोष नखाते, श्री. प्रदीप टेक, श्री. श्रीकांत बोर्से, श्री. कैलाससेठ टपकीर आणि श्री. श्रेयस पाटील यांनी सायकलपटूंना शुभेच्छा दिल्या.या मोहिमेत सहभागी सायकलपटू होते - गिरीराज उमरीकर, अजित पाटील, श्रीकांत चौधरी, प्रशांत तयाडे, सुशील मोरे आणि प्रतीक पवार.पहिल्या दिवशी सुमारे २२० कि.मी. अंतर पार करत पुणे - वाघोली - अहिल्यानगर - देवगड असा प्रवास करण्यात आला. यावेळी देवगड येथे भगवान दत्तात्र्यांचे दर्शन घेण्यात आले तिथुन २० कि मि पुढे मुक्काम केला.

दुसऱ्या दिवशी पहाटे ४.३० वाजता येथून प्रवास सुरू झाला. छत्रबपती संभाजीनगर - पुढे जालना मार्गे सायकलपटू देऊळगाव राजा येथे ४ वाजता पोहोचले. जवळच राजमाता जिजाऊ यांचे जन्मस्थान सिंदखेड राजा या ऐतिहासिक स्थळाला भेट देण्यात आली. संध्याकाळी श्री बालाजी महाराजांचे दर्शन घेऊन रात्रीचा मुक्काम देऊळगाव राजा येथे करण्यात आला.

तिसऱ्या दिवशी पहाटे ५ वाजता प्रवास सुरू झाला. चिखली व खामगाव मार्गे शेगावकडे जाताना शेगाव येथे सायंकाळी ४ वाजता शेगाव येथे पोहोचून सहा मित्रंनी ही ४८० कि.मी. सायकल मोहीम यशस्वीरीत्या पूर्ण झाली आणि प्रशांत ने गावाकडे झेप घेत ५२० कि. मी. अंतर करुन आपल्या बेलखेड येथील घरी पोहचून पुर्ण केली. ही सायकल मोहीम प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आली असून, 'फिट इंडिया'चा संदेश देणे व तरुण पिढीला आरोग्यदायी जीवनशैलीकडे प्रेरित करणे हा तिचा मुख्य उद्देश होता. यापुर्वी प्रशांत ने पुणे - कन्याकुमारी, पुणे - अयोध्या, पुणे - सोमनाथ अशा सायकल मोहिमे यशस्वी पणे केल्या त्या दरम्यान पुणे - शेगाव - बेलखेड ला जाण्याचा निच्चय केला होता आणि हि मोहिम वडील राम रतन तायडे यांच्या आठवणीत समर्पित केली.

## IISF २०२५ अंतर्गत MoES च्या 'वन इनोव्हेशन' राष्ट्रीय स्पर्धेत अरजित मोरे विजेता

### 'इल्युम्ब्रेल्ला २.०' सौर नवोन्मेषाने वेधले सर्वांचे लक्ष

■अकोला,दि.३१ (प्रतिनिधी)■



महाराष्ट्रातील इयत्ता ८ वी चा विद्यार्थी अरजित अमोल मोरे यांची 'वन इनोव्हेशन – टुवर्ड्स अ सेल्फ रिलायंट इंडिया' या राष्ट्रीय स्पर्धेत निवड झाली असून, तो या स्पर्धेतील तीन राष्ट्रीय विजेत्यांपैकी एक ठरला आहे. भारत आंतरराष्ट्रीय विज्ञान महोत्सव (IISF) २०२५ अंतर्गत पृथ्वी विज्ञान मंत्रालय (MoES) व चूर्त्रीं यांच्या संयुक्त विद्यमाने हि स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.या देशव्यापी उपक्रमाची घोषणा केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान तसेच पृथ्वी विज्ञान मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी केली होती. विद्यार्थ्यांनी, स्टार्टअप्सनी आणि तरुण नवोन्मेषकांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'आत्मनिर्भर भारत' या संकल्पनेला पूरक, व्यवहार्य आणि उपयुक्त कल्पना मांडाव्यात, असे आवाहन त्यांनी केले होते.देशभरातून प्राप्त झालेल्या १,०६२ प्रवेशिकांमधून केवळ तीन नवोन्मेषकांची निवड करण्यात आली. त्यामध्ये महाराष्ट्रातून एकमेव विजेता म्हणून अरजित अमोल मोरे याची निवड झाली असून, त्यामुळे राज्याला तसेच त्याच्या स्वामी विवेकानंद हायस्कूल, चेंबूर (मुंबई) या शाळेला गौरव प्राप्त झाला आहे.डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक सुवर्णपदकाचा मानकरी असलेला अरजित 'लिट्लन्टिस्ट' (लिटल सायंटिस्ट) या नावानेही ओळखला जातो. त्यानी 'जिज्ञासा : फ्रॉम क्युरिऑसिटी टू क्लॅरिटी' हे पुस्तकही लिहिले असून, ते सीएसआयआर-नॅशनल केमिकल लॅबोरेटरी (NCL), पुणे येथे झालेल्या 'वन डे अॅज अ सायंटिस्ट' भेटीतून प्रेरित आहे.अरजित याचा विजयी नवोन्मेष 'इल्युम्ब्रेल्ला २.०' हा प्रकल्प चलनशील सौरऊर्जा आधारित प्रणाली असून, ती रस्त्यावरील विक्रेते, शेतकरी आणि घरगुती वापरासाठी उपयुक्त ठरेल. छत्रीच्या संकल्पनेवर आधारित ही प्रणाली प्रकाश, मोबाईल चार्जिंग आणि मूलभूत वीजपुरवठा देत असून, पारंपरिक वीजेवरील अवलंबित्व कमी करते.

## ११ फेब्रुवारी रोजी शिर्डी येथे धनगर आरक्षणाचे रणशिंग फुंकणार :बोराडे

■अकोला,दि.१ (प्रतिनिधी)■



राज्यातील धनगर समाजास अनुसूचित जमातीमध्ये समाविष्ट करण्यासाठी दिनांक ११ फेब्रुवारी रोजी शिर्डी येथे धनगर समाजाची राज्यस्तरीय बैठक आयोजित करण्यात आली असून यामध्ये पुढील धनगर आरक्षणाची दिशा ठरविण्यात येऊन आंदोलनाचे रणशिंग फुंकणार असल्याची माहिती धनगर समाजाच्या आरक्षण आंदोलनाचे राज्यस्तरीय नेते जालना येथील दीपक बोराडे यांनी दिली.रविवारी स्थानीय शासकीय विश्राम गृहात धनगर आरक्षणाच्या राज्यस्तरीय आंदोलनाच्या संदर्भात बोराडे यांची पत्रकार परिषद संपन्न झाली. यात त्यांनी समाजाच्या विविध प्रलंबित सामाजिक प्रश्नांना अधोरेखित केले. धनगर समाज हा पूर्वीपासूनच राज्यातील अनुसूचित जमाती प्रवर्गात असताना केवळ नाम सादृश्याच्या आधारे या समाजाला इतर मागास प्रवर्गात टाकून समाजावर अन्याय करून संविधानाची पायमल्ली करण्यात आली आहे.

काही राज्यात हा समाज अनुसूचित जाती, जमाती,ओबीसी अशा अन्य प्रवर्गात समाविष्ट असून राज्यात तो अनेक वर्षापासून अनुसूचित जमातीत समाविष्ट होता.या संदर्भात आम्ही आरक्षण मागित नसून आरक्षण हा संविधान नुसार धनगर समाजाचा हक्क व अधिकार आहे. राज्यातील जाती प्रवर्गाच्या ३७ क्रमांकावर धनगर ही जात असून ती अनुसूचित जमातीमध्ये समाविष्ट असून त्याची अंमलबजावणी त्वरित करण्यात यावी, अन्यथा भाजप सरकारला राज्यातील धनगराच्या मोठ्या आंदोलनाला सामोरे जावे लागणार असल्याचा इशारा त्यांनी यावेळी दिला. ते म्हणाले, धनगर हा समाज राज्यात मोठ्या प्रमाणात असून हाच भाजप सरकारला सत्तेतून दूर करू शकतो. अनेक मतदारसंघात हा समाज प्रभावी असून आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकांमध्ये राज्यातील धनगर समाज हा भाजपला त्याची जागा दाखवून दिल्याशिवाय राहणार नसल्याचा इशारा ही त्यांनी यावेळी दिला. आगामी निवडणुकीत हा समाज दखलपात्र समाज म्हणून नोंद होणार असल्याचे आहे. सरकारने जर समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गात समावेश केले नाही तर भाजपचे उमेदवार पाडणार असल्याचा संकेतही त्यांनी यावेळी दिला.११ फेब्रुवारी रोजी समाजाच्या सामाजिक कार्यकर्त्यां नी शिर्डी येथे उपस्थित होण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. या पत्रकार परिषदेत धनगर समाज संघटनेचे अध्यक्ष ज्ञानेश्वर सुलताने, गोपाल कोल्हे,केशवराव पातोंड, गोपाल गावंडे, मध्य प्रदेश येथील धनगर आंदोलन जे पी बघेल, मुरहरी पाचपोर, बिरू कोळेकर, एम के दिवनाले,मनोज वरणकार,शंकर खराटे, विक्की लाखे, विशाल दिवनाले, मोहनराव नागे, दादाराव सुलताने, ज्ञानेश्वर कवळकार, मनीष गावंडे आदी उपस्थित होते.

## कृषि विद्यापीठात आजपासून दोन दिवसीय राज्यस्तरीय मृदा विज्ञान परिसंवादाचे आयोजन!

■अकोला,दि.१ (प्रतिनिधी)■

जागतिक हवामान बदलाचे या अतिशय आव्हानात्मक काळात भारतीय शेती शाश्वत होण्यासोबतच शेतकरी संपन्न होण्यासाठी जमिनीचे आरोग्य संवर्धन व वृद्धीकरण होणे हि काळाची गरज ओळखत इंडियन सोसायटी ऑफ सॉइल सायन्स, अकोला चॅप्टर व मृदा विज्ञान विभाग डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांचे संयुक्त विद्यमाने मृदा व उपजीविका सुरक्षेसाठी आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा अवलंब या विषयावर दिनांक २ ते ३ फेब्रुवारी २०२६ दरम्यान दोन दिवसीय राज्यस्तरीय परिसंवादाचे आयोजन अकोला येथे करण्यात आले आहे. सोमवार दिनांक २ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता समिती सभागृह, कृषी महाविद्यालय, अकोला येथे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांचे अध्यक्षतेत व फर्टिलायझर असोसिएशन ऑफ इंडिया, नवी दिल्लीचे महासंचालक व भारतीय कृषि अनुसंधान परिषद नवी दिल्लीच्या नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन विभागाचे माजी उपमहासंचालक डॉ. सुरेशकुमार चौधरी यांचे शुभ हस्ते उदघाटीत होणाऱ्या या अतिशय महत्वाकांक्षी परिसंवादाचे प्रसंगी महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरीचे कुलगुरू व राष्ट्रीय मृदा विज्ञान संस्था नवी दिल्लीचे उपाध्यक्ष डॉ. विलास खर्चे, प्रा. डॉ. इंद्रमणी, तसेच राष्ट्रीय मृदा सर्वेक्षण व भूमी उपयोग संस्थान, नागपूरचे संचालक डॉ.नितीन पाटील आदीची विशेष उपस्थिती लाभणार आहे.

# विमानतळाला संत गजानन महाराजांचे नाव देण्यात याव

## खा .अनुप धोत्रे यांची केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्याकडे मागणी

■अकोला,दि.१ (प्रतिनिधी)■

विदर्भाची पंढरी संत नगरी अकोल्यापासून ४५ किलोमीटर दूर असून विदर्भ पश्चिम विदर्भाची ओळख संत गजानन महाराज यांच्यापासून असून मोठ्या प्रमाणात अकोल्यातून विमान सेवा सुरू झाल्यावर भाविक भक्त मोठ्या प्रमाणे येणार असून अकोला विमानतळाला संत गजानन महाराज विमानतळ हे नाव देण्यात यावं अशी मागणी खासदार अनुप धोत्रे यांनी केंद्रीय राज्यमंत्री नामदार मुरलीधर मोहोळ यांना केली. संत गजानन महाराज नगरी शेगाव येथे मोठ्या प्रमाणात मुंबई आणि देशभरातून मोठ्या प्रमाणात भक्तगण येत असतात उत्कृष्ट व्यवस्थापन सोबत मानवतेच्या कार्यामुळे संत गजानन महाराज संस्थेचे नाव सर्वदूर असून अकोल्यातील मोठ्या प्रमाणात भावीक भक्त दर गुरुवारी मोठ्या संख्यातून जात असतात आणि अकोले करांच्या असंख्य नागरिकांची मागणी आहे की संत गजानन महाराज विमानतळ हे नाव देण्यात यावं आणि या दृष्टीने राज्य शासनाला सूचना देण्यात यावा व यासंदर्भात राज्याचे मुख्यमंत्री नामदार देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सुद्धा खासदार अनुप धोत्रे यांनी मागणी केली असून



महाराष्ट्र सरकार या संदर्भातला ठराव मंजूर करून राज्य शासनाकडे पाठवल्यास तरी त्वरित कारवाई करून भावी भक्तांच्या भावना जपण्यातील असे अभिवचन नामदार मुरलीधर मोहोळ यांनी देऊन आपण स्वतः गजानन भक्त असून अनेक विदर्भातील नागरिक पुण्यात असून त्यांचा पाठिंबा आपल्याला असल्याची सांगून त्यांनी खासदार अनुप धोत्रे यांच्या पाठपुरावा बद्दल अभिनंदन करून राज्य शासनाने विमानतळ विस्तारासाठी जमीन अधिकरणाचा काम सुरू केले असून जिल्हाधिकारी वर्षाताई मीना यांच्याकडे जबाबदारी देण्यात आली आहे आणि लवकरच १८ मीटर रुंदीची धावपट्टी च काम सुरू होईल असाही विश्वास करून यासाठी राज्य शासन आणि केंद्र सरकार मदत करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे अभिवचन सुद्धा नामदार मुरलीधर मोहोळ यांनी खासदार अनुप धोत्रे यांना दिले.

विशेष पायलट प्रशिक्षण केंद्र संदर्भात सुद्धा कारवाई सुरू असल्याची त्यांनी सांगून छोटीशी विमानसेवा संदर्भात सुद्धा अनेक कंपन्याशी चर्चा सुरू असल्याची त्यांनी सांगितले.

### हिंगणा वैजनाथ येथील नवनाथ महाराजांच्या मुर्त्यांची विटंबना करणाऱ्या माथेफिरूंना कठोर शिक्षा

■अकोला,दि.१ (प्रतिनिधी)■

शेगाव तालुक्यातील हिंगणा वैजनाथ या गावातील सनातन हिंदू धर्मीयांचे आणि नाथसंप्रदायाचे वारकरी संप्रदायाचे, आराध्यदैवत, श्रद्धास्थान, प्रेरणास्थान, पूज्यनीय नवनाथ महाराजांच्या मूर्तींची अज्ञात समाजकंटकांनी विटंबना केली. त्या घटनेचा निषेध व धार्मिक द्वेष करणाऱ्या राष्ट्रद्रोही विचारसरणीच्या व हे अविवेकी कृत्य करणाऱ्या माथेफिरूंना त्वरित शोधून त्यांच्यावर कठोरात कठोर कारवाई करून त्यांना शिक्षा करण्यात यावी. याकरिता सकल हिंदू समाज व युवा नाथ संघटना यांच्या संयुक्त विद्यमानाने जाहीर जाहीर निषेध मोर्चाचे आयोजन दिनांक २-२-२०२६ सोमवार फेब्रुवारी रोजी सकाळी दहा वाजता राजेश्वर मंदिरा येथे करण्यात आलेले आहेत तरी सर्व सकल हिंदू समाजाने उपस्थित राहून निषेध मोर्चामध्ये सहभागी व्हावे असे आवाहन केले.

# तडीपार इसमावर कारवाई तसेच खुल्या जागेत दारू पिणाऱ्या ७५ विरूध्द कारवाई



■अकोला,दि.१ (प्रतिनिधी)■

जिल्हयात मालमत्तेच्या गुन्हयांना आळा बसावा याकरीता दि.३१.०१.२०२६ चे रात्री २०.०० वा ते दि. ०१. ०२.२०२६ चे ०४.०० वा पावेतो मा. पोलीस अधीक्षक, श्री अर्चित चांडक यांचे आदेशान्वये अकोला जिल्हयात ऑलआउट कोम्बींग ऑपरेशन चे आयोजन करण्यात आले होते. त्या अनुषंगाने अपर पोलीस अधीक्षक, अकोला, सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्व ठाणे प्रभारी अधिकारी व दुय्यम अधिकारी असे एकुण ३६ अधिकारी व २१२ अंमलदार यांनी सहभाग घेवुन नाकाबंदी दरम्यान खालील प्रमाणे प्रभावी कारवाई करण्यात आली.

ऑलआउट कोम्बींग ऑपरेशन दरम्यान बेरेकेटींग करून जिल्हयात ७५८ वाहने चेक करून मोटार वाहन कायदयान्वये १३२ कारवाई करून ६२५००/- रू चा दंड आकरण्यात आला आहे. तसेच १७९ समन्स, ७३ जमानती वॉरंट, २९ पकड वॉरंट तामील करण्यात आले. ६३ अभिलेखावरील निगराणी बदमाश व माहितीगार गुन्हेगार यांना चेक करण्यात आले व कलम १२२ मपोका प्रमाणे १६ कारवाई, भारतीय हत्यार कायदयान्वये ०३ केसेस करून ०३ घातक शस्त्रे जप्त करण्यात आले. कलम १४२ मपोका प्रमाणे ०२ कारवाई, कलम ३३ आर डब्लयु प्रमाणे ०१ केसेस तर कलम ११०,११७ प्रमाणे ७५ केसेस करून जिल्हयातील ४७ हॉटेल लॉजेस व ८१ एटीएम चेक करण्यात आले. महाराष्ट्र दारू बंदी कायदयान्वये जिल्हयात ०८ केसेस तसेच ०५ जुगार कारवाई करण्यात आली आहे. ड्रंक ॲन्ड ड्राईव्ह प्रमाणे ०१ केस करण्यात आली आहे.

# गुन्ह्यातील फरार आरोपी २९०० कि.मी. पाठलाग करुन केली अटक

■अकोला,दि.१ (प्रतिनिधी)■

पोलिस स्टेशन मुर्तिजापुर ग्रामीण येथे दि. ११/०१/२०२६ रोजी फिर्यादी नामे समीर गंगाधर जाधव रा. अनभोरा ता. मुर्तिजापुर यांनी जबानी रिपोर्ट दिला की फिचा मित्र आशिष देशमुख रा. कंझरा याचे गुन्हयातील आरोपी नामे प्रतिक खंडारे रा. भिमनगर मुर्तिजापुर याचे सोबत झालेल्या जुन्या वादावरून ग्राम शेलु वेताळ येथील यात्रेम धील मोटार सायकल पार्किंग स्टँड जवळ आरोपी याने फि चा मित्र आशिष देशमुख याचे सोबत वाद करून त्याला शिवीगाळ केली तसेच सोबत असलेले इतर रा. कंझरा याने त्याचे हातात दगड घेवुन आशिष देशमुख याचे डोक्यावर मारून जखमी केले तसेच फि चा मित्र पियुष खांडेकर यास मारहाण करीत असतांना फि त्यांचे भांडण सोडवण्यास गेला असता आरोपी मीर मुसैब हुसैन मेहंदी हुसेन याने आरोपी ०१) मीर मुसैब हुसैन मेहंदी हुसेन ०२) सुजल उमेश जाधव तिन्ही रा. मुर्तिजापुर, ०३) सुमित महादेव शिरेकर रा. कंझरा ता. मुर्तिजापुर सोबत असलेले यांनी लाथा बुक्क्यांनी मारहाण केली तसेच आरोपी मीर मुसैब हुसैन मेहंदी हुसेन याने त्याचे जवळील चाकुने फि चा मित्र आशिष देशमुख याचे डावे गालावर मारून गंभीर जखमी केले तसेच आरोपी सुमित महादेव शिरेकर त्याचे



जवळील चाकुने फिर्यादी च्या उजव्या मांडीवर मारून जखमी करून घटनास्थळावरून पळुन गेले अशा फि चे जबानी रिपोर्ट व डॉ.चे मेडीकल सर्टीफिकेट वरून पोस्टेला अप क्रं. १४/२६ कलम ११८(१), ११८(२), ११५,३५१(२),३५२, ३ (५) बिएनएस प्रमाणे गुन्हा दाखल करून तपासात घेतला. नमुद गुन्हा घडल्यापासुन यातील आरोपी हे फरार होते सतत आपले ठिकाण बदलत होते. मा.श्री.अर्चित चांडक पोलिस अधिक्षक सा. अकोला यांचे सुचना नुसार तात्काळ आरोपी शोधकामी तिन पथक तयार करून रवाना करण्यात आले. त्याकरीता गोपनिय बातमीदार तसेच सायबर पोलिस स्टेशन यांची तांत्रीक मदत घेवुन त्यांचा सतत पाठलाग करण्यात आला यादरम्यान त्यांचा अमरावती, बडनेरा, नागपुर, ठाणे, बृहंमुबई, कल्याण व पुणे हया मोठया शहरांत शोध घेण्यात आला. त्याकरीता सीसीटीव्ही फुटेज, वेगवेगळे धाम र्िक स्थळ, हॉटेल, लॉजेस, पर्यटन स्थळ, आश्रम शाळा, रेल्वे स्टेशन, बस स्टॅण्ड परीसर असा २९०० कि.मी. प्रवास करून त्यांचा पाठलाग करत वेगवेगळया ठिकाणी शोध घेण्यात आला व गोपनिय बातमीदार तसेच तांत्रीक मदतीने चाकण, जिल्हा पुणे येथे नमुद चारही आरोपी यांना मोठ्या शिताफिने अटक करून पोस्टेला आणुन पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येत आहे.

# ३८ वर्षांच्या सेवेला मानवतेचा सन्मान; बसंती चांडक रिलीफ फाउंडेशनचा नेत्रआरोग्यासाठी अभिनव उपक्रम संपन्न

## सौ. वंदना मेहता व ट्रस्टी रमाकांत खेतान यांच्या हस्ते रुग्णांना मोफत चष्मा फ्रेमचे वाटप

■अकोला,दि.१ (प्रतिनिधी)■

नागरिकांच्या नेत्रआरोग्याची काळजी घेणारा आणि समाजसेवेची परंपरा जपणारा बसंती चांडक रिलीफ फाउंडेशन ट्रस्ट यांचा विशेष सामाजिक उपक्रम रामदास पेठ येथील बसंती हॉस्पिटल व नेत्र हॉस्पिटल येथे उत्साहात संपन्न झाला. या उपक्रमाअंतर्गत डोळ्यांची तपासणी करणाऱ्या रुग्णांना मोफत चष्म्याची फ्रेम देण्यात आली. या उपक्रमाचे उद्घाटन ट्रस्टच्या मॅनेजिंग डायरेक्टर सौ. वंदना मेहता यांच्या हस्ते करण्यात आले, तर रुग्णांना मोफत चष्म्याच्या फ्रेमचे प्रत्यक्ष वाटप ट्रस्टी रमाकांत खेतान यांच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी हॉस्पिटल मधील डॉक्टर नेत्रतज्ञ डॉ नेहा अग्रवाल यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. विशेष म्हणजे, बसंती चांडक रिलीफ फाउंडेशन ट्रस्टची स्थापना सन १९८८ मध्ये झाली असून, ट्रस्टला यंदा ३८ वर्षे पूर्ण झाली आहेत.या ३८ वर्षांच्या प्रदीर्घ सेवाकाळात ट्रस्टने आरोग्य, समाजसेवा व मानवतावादी उपक्रमांच्या माध्यमातून सातत्याने उल्लेखनीय कार्य केले आहे. ट्रस्टच्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून हा नेत्रआरोग्य उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाचा लाभ विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक तसेच सर्वसामान्य नागरिकांनी मोठ्या संख्येने घेतला. वाढत्या डोळ्यांच्या समस्या लक्षात घेता वेळेवर तपासणी व उपचार मिळावेत, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.

# संत रविदास महाराज जयंती उत्साहात साजरी



■अकोला,दि.१ (प्रतिनिधी)■

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी १फेब्रुवारी २०२६ रोजी रेल्वे स्टेशन चौक येथे चर्मकार समाजाच्या वतीने संत रविदास महाराज जयंती मोठ्या आनंद उत्साहात साजरी करण्यात आली. सर्वप्रथम मान्यवरांनी संत रविदास महाराज यांच्या प्रतिमेला हारअर्पण करण्यात आले. यावेळी मान्यवरांनी त्यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकून त्यांनी कशाप्रकारे समतेचा बंधुत्वाचा संदेश प्रबोधन त्यांच्या वाणीतून केले हे आपल्या भाषणातून सांगितले. जयंतीनिमित्त समाजाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी भोजन दानाचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता.यावेळी चर्मकार समाजाचे नवयुवक संतोष कुरील, खुशाल राजे,दिनेश कुरील, सुरज खेडकर,बबलू देशमुख, कार्तिक जाधव, दीपक जपसरे, सूर्यभान लोढे, रामटेक, पत्रकार शैलेंद्र वानखडे, ज्येष्ठ नेते आबासाहेब शिरसाट व समाजातील बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आ.रणधीर सावरकरांच्या वाडेगावात सांत्वन पर भेटी



■अकोला,दि.१ (प्रतिनिधी)■

अकोला पूर्वचे आ. मा. रणधीरभाऊ सावरकर यांनी सर्व भाजपा पदाधिकाऱ्यांसह अशोक मानकर, सुनील मानकर, जीवन गिरी, निलेश मसने व भगवान वाघ यांच्या घरी जाऊन सांत्वन पर भेटी दिल्यात यावेळी त्यांच्यासोबत रणधीर भाऊ सावरकर मनोहर राहणे माधव मानकर छाया मानकर सुनील मानकर नितीन लांडे किशोर कुचके राहुल लोधी अर्चना मसने संजय सरप अनिल बारबुदे हर्षल जढाळ विजुय चिंचोलकर गणेश कंडा रकर अंकुश शहाणे सुनील घाटोळ शिवदास मानकर जीवन गिरी शिवा कळसकर हे सर्व भाजपा पदाधिकारी उपस्थित पत्रकार राजेद्र पल्हाडे इत्यादी कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.





## थोडक्यात

### विनापरवाना मुरूम वाहतूक करणारे दोन ट्रॅक्टर जप्त मूर्तिजापूर ग्रामीण पोलिसांची मोठी कारवाई

मुर्तिजापुर : अवैध गौण खनिज उत्खनन आणि वाहतुकीविरोधात महसूल विभाग आणि पोलिसांनी धडक कारवाई सुरू केली आहे. मूर्तिजापूर ग्रामीण पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या कंझरा येथे अवैध मुरूम वाहतूक करणारे दोन ट्रॅक्टर पकडण्यात आले असून, चालकांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.दिनांक २९ जानेवारी २०२६ च्या रात्री ११:०० वाजेच्या सुमारास, कंझरा येथील जागेश्वर मंदिराजवळ महसूल विभागाचे मंडळ अधिकारी. रवींद्र पुरी यांनी नाकाबंदी केली होती. यावेळी दोन विना नंबरचे ट्रॅक्टर संशयास्पद रित्या मुरूम खाली करताना आढळले. अधिकारी यांनी विचारणा केली असता, चालकांकडे मुरूम वाहतुकीचा कोणताही परवाना (रॉयल्टी) किंवा अधिकृत पास नव्हता. शासनाची दिशाभूल करून विनापरवाना गौण खनिजाची चोरी केल्याचे निष्पन्न झाल्याने ही कारवाई करण्यात आली.जप्त केलेला मुद्देमाल या कारवाईत पोलिसांनी एकूण ४ लाख ४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे, ज्यामध्ये दोन विना नंबरचे ट्रॅक्टर मुंडा व ट्रॉलीसह, किंमत अंदाजे ४ लाख रुपये. दोन ब्रास मुरूम किंमतअंदाजे ४,००० रुपयांचा समावेश आहे. या प्रकरणात खालील दोघाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यामध्ये योगेश अशोकराव देशमुख वय ४० वर्ष, रा. कंझरा, प्रशांत गजानन देशमुख वय ३९ वर्ष, रा. कंझरा यांचा समावेश आहे. तहसील कार्यालयाचे मंडळ अधिकारी महादेव उत्तमराव भगत यांच्या तक्रारीवरून मूर्तिजापूर ग्रामीण पोलीस स्टेशनचे ठाणेदार श्रीधर गुट्टे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ (इतर) च्या कलम ३०३ (२) सह खाण व खनिज अधिनियम १९५८ च्या कलम ३, ४, २१ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

### शालेय गटात प्रभातची आनंदी राजेश मोडक व महाविद्यालय गटात निकीता दुबे प्रथम

अकोला - बाबूजी देशमुख वाचनालयाचे वतीने ' भगवान महावीरांचे जीवन व कार्य ' या विषयाव शालेय गटात आयोजित वक्तृत्व स्पर्धेत - प्रभात किड्स स्कुल ची कु. आनंदी राजेश मोडक प्रथम पुरस्कार व रनिंग ट्रॉफी ची मानकरी ठरली. व्दितीय क्रमांक - कु. अदिती अविनाश नळकांडे (स्कूल ऑफ स्कॉलर),तृतीय क्रमांक - संदीप झाडे (उत्तमचंद राजेश्वर इंग्लिश स्कूल ) तर महाविद्यालय गटात 'वर्तमान काळात जैन तत्वांची प्रसंगीकता ' या विषयावर घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेत कु. निकिता अरुण दुबे प्रथम पुरस्कार व रनिंग ट्रॉफी ची मानकरी ठरली. बाबूजी देशमुख वाचनालयाचे अध्यक्ष महादेवराव भुईभार यांचे हस्ते विजयी स्पर्धकांना रनिंग ट्रॉफी व स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. बाबूजी देशमुख वाचनालयाचे सचिव अनुराग मित्र यांची या प्रसंगी प्रमुख उपस्थित होती.

# जागृती शाळेत स्त्री आरोग्य जागृतीचा दीप प्रज्वलित

## - डॉ. रेखा पाटील यांचे प्रेरणादायी मार्गदर्शन

■अकोला,दि.१ (प्रतिनिधी)■

दिनांक ३१ जानेवारी २०२६, शनिवार रोजी जागृती प्राथमिक सेमी इंग्लिश शाळा येथे हळदीकुंकू व स्त्री आरोग्य विषयक मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाला जागृती शिक्षण प्रसारक संस्थेच्या संचालिका सौ. शोभाताई वखरे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून अकोला शहरातील सुप्रसिद्ध व नामवंत स्त्री रोग तज्ञ डॉ. रेखा अभय पाटील उपस्थित होत्या. तसेच सहज योग मेडिटेशनच्या संचालिका सौ. अश्विनीताई भारती या दुसऱ्या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे हळदीकुंकू समारंभात सासू-सून तसेच विद्यार्थिनी मोठ्या संख्येने सहभागी झाल्या, ज्यामुळे कार्यक्रमाला पारंपरिक संस्कृतीचा आणि सामाजिक एकात्मतेचा सुंदर रंग लाभला. स्त्री आरोग्याबाबत सखोल मार्गदर्शन - डॉ. रेखा पाटील यांचा प्रभावी संवाद प्रमुख वक्त्या डॉ. रेखा अभय पाटील यांनी स्त्रियांच्या आरोग्याशी संबंधित विविध समस्यांवर सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी महिलांमध्ये आढळणाऱ्या



आजारांची माहिती देत स्वच्छता, आहार, मानसिक आरोग्य, नियमित तपासणी आणि महिलांनी स्वतःकडे लक्ष देण्याचे महत्त्व स्पष्ट केले.महिलांनी विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी अत्यंत सुलभ व वैज्ञानिक पद्धतीने उत्तरे देत स्त्री आरोग्याबाबत समाजात जागृती निर्माण करण्याचा प्रेरणादायी संदेश दिला. त्यांच्या मार्गदर्शनामुळे उपस्थित महिलांमध्ये आरोग्याबाबत सकारात्मक दृष्टिकोन निर्माण झाला.सहज योग मेडिटेशनच्या संचालिका सौ. अश्विनीताई भारती यांनी ध्यानधारणा (मेडिटेशन) चे जीवनातील महत्त्व स्पष्ट करत मानसिक शांती, तणावमुक्त जीवन आणि एकाग्रता वाढविण्यासाठी मेडिटेशन कसे उपयुक्त आहे यावर सखोल मार्गदर्शन केले.

### खेट्री येथे मुख्यमंत्री पंचायत राज अभियानाबाबत जनजागृती

**पातूरः** तालुक्यातील खेट्री येथे ग्रामपंचायत कार्यालयात भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. ध्वजारोहणानंतर यावेळी मुख्यमंत्री पंचायत राज अभियानाअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध लोककल्याणकारी योजनांची माहिती ग्रामस्थांना देण्यात आली. या अभियानांतर्गत शेत पांदण रस्ते, तंबाखूमुक्त व व्यसनमुक्त गाव, तसेच कुष्ठरोग निर्मूलन यासारख्या महत्त्वाच्या विषयांवर जनजागृती करण्यात आली.

आरोग्यदायी, स्वयंपूर्ण व आदर्श गावनिर्मितीसाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

RNI NO-46973/1986 Mahasagar Akola Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak. Printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Kamala Square, Durga Chowk, Akola. Group Editor-in-Chief and Managing Director - Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak. Local Editor Purushottam Madhukarrao Dhole Phone 9881489479 (Responsible for editorial as per PRB act). Head Office Phone 7447735851,9922970023.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७३/१९८८ महासागर अकोला मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, मिला स्केअर, दुर्गा चौक, अकोला, येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक स्थानिक संपादक : "पुरुषोत्तम मधुकरराव ढोले, फोन : ९८८१४८९४७९" (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील.)

# इंडियावुड २०२६: लाकूड प्रक्रिया व फर्निचर उत्पादनातून भारताच्या विकासाला नवी चालना

**बंगळुरू, १ फेब्रुवारी :** २६ फेब्रुवारी ते २ मार्च २०२६ दरम्यान बंगळुरू येथील बेंगळुरू इंटरनॅशनल एक्झिबिशन सेंटर येथे इंडियावुड २०२६ या जागतिक दर्जाच्या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येणार आहे. न्युर्नबर्गमेस्से इंडिया यांच्या वतीने आयोजित होणाऱ्या या द्वैवार्षिक प्रदर्शनाची ही २६ वी आवृत्ती असून, लाकूड प्रक्रिया, फर्निचर उत्पादन व मॅट्रेस निर्मिती क्षेत्रातील एक आंतरराष्ट्रीय शिखर परिषद म्हणून इंडियावुड ओळखली जाते. या प्रदर्शनाला युरोपियन फेडरेशन ऑफ वुडवर्किंग मशिनरी मॅन्युफॅक्चरर्सयांचे अधिकृत पाठबळ आहे.

आतापर्यंतची सर्वात मोठी आवृत्ती ठरणाऱ्या इंडियावुड २०२६ मध्ये ५० हून अधिक देशांतील १,००० पेक्षा जास्त ब्रँड्स सहभागी होणार आहेत. सुमारे ९०,००० हून अधिक उद्योग व्यावसायिकांची उपस्थिती अपेक्षित असून, ८५,००० चौरस मीटर क्षेत्रफळावर हे प्रदर्शन भरवले जाणार आहे. मागील आवृत्तीच्या तुलनेत सुमारे १५ टक्क्यांची वाढ या प्रदर्शनातून दिसून येते. भारताच्या उत्पादन क्षमतेवरील वाढता जागतिक विश्वास आणि विकसित भारत या दृष्टीकोनाशी सुसंगत अशी ही घडामोड आहे, ज्यामध्ये प्रगत उत्पादन, निर्यात व जागतिक एकात्मता हे प्रमुख विकास चालक आहेत.

आगामी प्रदर्शनाबाबत न्युर्नबर्गमेस्से इंडिया यांच्या व्यवस्थापकीय संचालक सोनिया प्रशर यांनी सांगितले,

इंडियावुड २०२६ हे भारतातील लाकूड प्रक्रिया व फर्निचर उत्पादन उद्योगातील वाढता आत्मविश्वास, परिपक्वता आणि जागतिक महत्त्वाकांक्षा यांचे प्रतीक आहे. आतापर्यंतची सर्वात मोठी आवृत्ती म्हणून हे प्रदर्शन भारताला विश्वासार्ह उत्पादन केंद्र व जागतिक पुरवठा साखळीतील एक महत्त्वाचा घटक म्हणून अधिक बळकटी देईल. आंतरराष्ट्रीय सहभागासह तंत्रज्ञान, शाश्वतता आणि कौशल्य विकासावर दिलेला भर हा उद्योग जागतिक स्पर्धेसाठी सज्ज असल्याचे दर्शवतो.

धोरणकर्त्यांनी मदर ऑफ ऑल डील्स असे संबोधलेल्या भारतयुरोपियन युनियन मुक्त व्यापार करारामुळे भारतीय लाकूड प्रक्रिया व फर्निचर उद्योगासाठी मोठ्या संधी निर्माण होत आहेत. या करारामुळे युरोपियन बाजारपेठांमध्ये सुलभ प्रवेश, बहुतेक व्यापार वस्तूंवरील शुल्कात कपात किंवा रद्दबातल, तसेच इंजिनिअर्ड वुड उत्पादने व घटकांच्या निर्यातीमध्ये लक्षणीय वाढ होण्याची शक्यता आहे. प्रगत मशिनरी आणि औद्योगिक इनपुट्सच्या सुलभ उपलब्धतेमुळे नवोन्मेष, निर्यात व आंतरराष्ट्रीय सहकार्याला गती मिळणार असून, या सर्व प्रक्रियांमध्ये इंडियावुड सातत्याने महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

# एसीसीने आर्थिक वर्ष २६ च्या तिसऱ्या तिमाहीत मजबूत कामगिरी केली

**अहमदाबाद, १ फेब्रुवारी :** विविध क्षेत्रातील अदानी पोर्टफोलिओचा भाग असलेली आणि भारतातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या बांधकाम साहित्य आणि उपाययोजना कंपन्यांपैकी एक असलेल्या एसीसी लिमिटेडने ३१ डिसेंबर २०२५ रोजी संपलेल्या तिमाहीत उत्कृष्ट कामगिरी केली असून, आतापर्यंतच्या सर्वाधिक तिमाही विक्रीची नोंद केली आहे. या तिमाहीतील कंपनीची प्रगती परिवर्तनात्मक पावलांचे प्रतिबिंब आहे, ज्यामध्ये एसीसी लिमिटेडचे अंबुजा सिमेंट्स लिमिटेडमध्ये विलीनीकरण करण्याची घोषणा ही प्रमुख आहे. यामुळे एक एकीकृत 'वन सिमेंट प्लॅटफॉर्म' तयार होईल, जो कंपनीच्या वाढीचा वेग वाढवेल, कार्यान्वयन उत्कृष्टता साधेल, भांडवली कार्यक्षमता सुधारेल, उद्योगातील नेतृत्व अधिक मजबूत करेल आणि दीर्घकालीन मूल्य निर्मितीला पाठिंबा देईल. या कामगिरीत प्रीमियम सिमेंट आणि सोल्यूशन्स-समृद्धीडी-मिक्सकाँक्रीट यावर विशेष भर दिला गेला आहे.

एसीसी लिमिटेडचे पूर्णवेळ संचालक आणि सीईओ श्री विनोद बहेती म्हणाले, आम्ही आणखी एका मजबूत तिमाहीसह आमची वाढीची गती कायम ठेवली आहे, ज्यामुळे आमचे आतापर्यंतचे सर्वाधिक तिमाही उत्पादन झाले आहे. उच्च व्यापार आणि प्रीमियम सिमेंट विक्रीसह आरएमएक्स मधील सतत वाढ यामुळे उद्योगातील इतर स्पर्धकांच्या तुलनेत चांगले महसूल मिळाले आणि मुख्य भागांमध्ये आमची बाजारातील स्थिती मजबूत झाली आहे. आमच्या योजनेचा भाग म्हणून, विशेषतः वीज खर्च, ग्रीन पॉवरचा वाटा वाढवणे, इंधन कार्यक्षमता, सुधारित डब्ल्यूएचआरएस आणि एएफआर वापर आणि लॉजिस्टिक्स खर्च कमी करण्यावर आम्ही लक्ष केंद्रित करत आहोत. वन सिमेंट प्लॅटफॉर्ममध्ये प्रस्तावित एकीकरणामुळे कार्यक्षमता आणि वाढ या दोन्हींना गती मिळण्याची अपेक्षा आहे, ज्यामुळे कायदेशीर मंजुऱ्या पूर्ण झाल्यानंतर खरेदी, उत्पादन आणि वितरणामध्ये अधिक सखोल समन्वय साधता येईल. सिनोक अंतर्गत आमचा डिजिटलायझेशन कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर उत्पादकता सुधारण्यासाठी आणि व्यावसायिक कार्यांना अनुकूल करण्यासाठी तयार केला आहे. आमचे विश्वसनीयता, पर्यावरण, गुणवत्ता आणि सुरक्षा हे स्तंभ आमचे प्रकल्प आणि प्रक्रिया कशा चालवल्या जातात याचा आधारस्तंभ आहेत आणि आम्ही या संदर्भात प्रणाली आणखी मजबूत केल्या आहेत. बाजाराच्या दृष्टीने, एसीसी गोल्डच्या नेतृत्वाखालील आमचा प्रीमियम पोर्टफोलिओ उत्कृष्ट ईबीआयटीडीए मार्जिन देत आहे आणि ट्रेड व प्रीमियम उत्पादनांचा वाढता वाटा महसुलातील फायद्यांना कायम ठेवेल अशी अपेक्षा आहे. आम्ही आमच्या ग्राहकांचे, एक लाखांहून अधिक भागीदारांच्या आमच्या विस्तृत डीलर आणि किरकोळ विक्रेत्यांच्या नेटवर्कचे आणि अदानी सिमेंट परिवाराला बळ देणाऱ्या सात लाखांहून अधिक प्रभावशाली व्यक्तींचे (मजुर/कंत्राटदार) आभारी आहोत. त्यांच्या पाठिंब्यामुळे आणि कार्यात्मक उत्कृष्टतेवर व शाश्वततेवर आमच्या अथक प्रयत्नांमुळे, एसीसी आपली वाढीची गती कायम ठेवण्यासाठी आणि भारताच्या पायाभूत सुविधांच्या प्रवासात एक विश्वासार्ह भागीदार म्हणून टिकून राहण्यासाठी उत्तम स्थितीत आहे.

# स्कूटी चालवण्याच्या आठवणी शेअर करताना म्हणते, माझी स्कूटी म्हणजे माझे स्वातंत्र्य होते, ती मला सगळीकडे घेऊन जायची : सुंबुल तौकीर खान

**मुंबई, १ फेब्रुवारी :** सोनी सबवरील इत्ती सी खुशी मालिकेत अन्विता (सुंबुल तौकीर खान) या निस्वार्थी तरुणीची कहाणी आहे, जी आपल्या भावंडांना आईच्या मायेने सांभाळते आहे. जीवनातील कठीण प्रसंगांमध्ये आपल्या कुटुंबाचा आधार बनण्यापासून ते प्रेम आणि विवाह यांच्यातील संतुलन सांभाळण्यापर्यंत अन्विताने नेहमीच त्याग केला आहे, जेणेकरून आपल्या आसपास शांतता नांदावी. फुड डिलिव्हरी सेवा सुरू करून आपला कॅफेचा व्यवसाय वाढवण्यासाठी ती प्रयत्नशील आहे. फुड डिलिव्हरीचे काम चांगल्या कार्यक्षमतेने करता यावे, यासाठी तिचा नवरा संजय (ऋषी सक्सेना) तिला एक स्कूटी भेट देतो

अलीकडेच सुंबुलने एक दृश्य चित्रित केले, ज्यामध्ये तिला स्कूटी चालवायची होती. गेल्या कित्येक वर्षांत तिने स्कूटी चालवली नव्हती. या क्षणामुळे अचानक जुन्या आठवणी तिच्या मनात दाटून आल्या. तिने सांगितले की, अनेक वर्षांपूर्वी ती स्कूटी चालवायला शिकली होती. त्यानंतर काही वर्षांनी तिने आपल्या मैत्रिणीची स्कूटी चालवली होती, पण त्यालाही आता बराच काळ लोटून गेला आहे. शूटिंग दरम्यान स्कूटीवर बसताना तिला आपला जुना काळ आठवला, त्यावेळची निरागसता आठवली आणि काही तरी नवीन शिकण्याचा रोमांचही आठवला. अशाप्रकारे, हे दृश्य अनपेक्षितपणे जुन्या आठवणींना उजाळा देणारे ठरले.

सुंबुल सांगते, काय गंमत आहे की, एक साधेसे दृश्य तुम्हाला किती भूतकाळात घेऊन जाते. मी जेव्हा स्कूटी चालवायला शिकले तेव्हा मला उत्साहाबरोबरच थोडी भीतीही वाटत होती. माझी स्कूटी हे माझे स्वातंत्र्य होते. ऑडिशन्स, कार्यशाळा, मित्र-मैत्रिणींशीभेटीगाठी, ती मला सगळीकडे घेऊन जायची. गेल्या कित्येक वर्षांत मी स्कूटी चालवलेली नाही. त्यामुळे, इत्ती सी खुशी मधल्या त्या दृश्यासाठी जेव्हा मी स्कूटीवर बसले तेव्हा माझ्या आयुष्यातल्या त्या सुरुवातीच्या काळात पोहोचले. माझे आयुष्यच मला परत जगत असल्यासारखे वाटले. मला गंमत वाटते की काहीकाही क्षण तुम्हाला ही आठवण करून देतात की तुम्ही कुठून सुरुवात केली होती आणि तुम्ही आता कुठे येऊन पोहोचला आहात.

# अदाणी पॉवरने क्यू३ एफवाय२६ निकाल जाहीर केले

**अहमदाबाद, १ फेब्रुवारी :** अदाणी पॉवर लिमिटेड (एपीएल), भारतातील खासगी क्षेत्रातील सर्वात मोठी औष्णिक वीज उत्पादक कंपनी, यांनी क्यू३ आणि ९एम एफवाय२६ चे आर्थिक निकाल जाहीर केले. वाढीव पावसाळा आणि थंड हवामानामुळे वीज मागणीत तात्पुरती घट झाली असतानाही कंपनीने स्थिर कामगिरी नोंदवली. क्यू३ एफवाय२६ मध्ये कंपनीने १२,७१७ कोटींचे स्थिर महसूल, ४,६३६ कोटींचा मजबूत ईबीआयटीडीए आणि २,४८८ कोटींचा निव्वळ नफा नोंदवला.

या तिमाहीत कंपनीने आपल्या दीर्घकालीन वाढीच्या धोरणाला बळकटी देत आसाम डिस्कॉमसोबत ३,२०० मेगावॅट क्षमतेचा दीर्घकालीन वीज खरेदी करार (पीपीए) मिळवला. यामुळे कंपनीच्या एकूण कार्यरत क्षमतेपैकी सुमारे ९०% क्षमता दीर्घ आणि मध्यम मुदतीच्या करारांतर्गत सुरक्षित झाली आहे, ज्यामुळे महसुलात स्थिरता येणार आहे. तसेच, अधिग्रहणानंतर अवघ्या चार महिन्यांत ६०० मेगावॅट क्षमतेचा बुटीबोरी प्रकल्प पूर्णपणे कार्यान्वित करण्यात आला. एफवाय२६ च्या पहिल्या नऊ महिन्यांत एकत्रित वीज विक्री ३.४% वाढून ७१.८ अब्ज युनिट्सवर पोहोचली. या कालावधीत कंपनीने ४०,५२४ कोटींचा महसूल, १५,७१३ कोटींचा ईबीआयटीडीए आणि ८,७०० कोटींचा मजबूत निव्वळ नफा नोंदवला. कमी बाजार दर आणि एकरकमी उत्पन्नात घट असूनही कार्यक्षमतेत सुधारणा व नियंत्रित वित्तीय खर्चामुळे कंपनीची कामगिरी सक्षम राहिली.

विस्तार योजनांसाठी निधी उभारणी करताना कंपनीने एएरेटिंग असलेल्या नॉन-कन्व्हर्टिबलडिबेंचर्सद्वारे ७,५०० कोटी उभारले आहेत. अदाणी पॉवर सध्या भारतातील सर्वात मोठ्या २३.७ जीडब्ल्यू औष्णिक वीज विस्तार प्रकल्पावर काम करत असून महान, रायपूर, रायगड आणि कोरबा येथे ब्राउनफिल्ड प्रकल्पांची अंमलबजावणी वेगाने सुरू आहे. यामुळे भविष्यातील मागणी पूर्ण करण्यास आणि खर्चात स्पर्धात्मकता वाढवण्यास मदत होईल.

निकालांवर भाष्य करताना अदाणी पॉवर लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. एस. बी. ख्यालिया म्हणाले, आमच्या स्पर्धात्मक क्षमतांमुळे आणि खर्च-कार्यक्षम प्रकल्पांमुळे अदाणी पॉवर मजबूत आर्थिक कामगिरी कायम ठेवत आहे. आगामी क्षमतांसाठी दीर्घकालीन पीपीए जलद गतीने सुरक्षित केले जात आहेत आणि प्रकल्प अंमलबजावणी लक्ष्यांनुसार सुरू आहे. भारतातील वाढत्या वीज मागणीवर आमचा ठाम विश्वास असून, देशाच्या ऊर्जा सुरक्षेसाठी विश्वासार्ह व परवडणारी वीज पुरवण्यास आम्ही कटिबद्ध आहोत.

# नागपुरात द स्किन अबोड क्लिनिकचे उद्घाटन, प्रगत व नैतिक त्वचारोग उपचारांची नवी दिशा

**नागपूर, १ फेब्रुवारी :** नागपूर शहरात संपूर्ण त्वचारोग उपचारांसाठी एक आधुनिक आणि विश्वासार्ह केंद्र सुरू झाले आहे. द स्किन अबोड क्लिनिक, एक अत्याधुनिक डर्मेटोलॉजी क्लिनिक, याचे उद्घाटन अनन्या असेंट, देव नगर चौक, अजनीखामला रोड, नागपूर येथे करण्यात आले आहे. हे क्लिनिक दररोज सायंकाळी ४ ते रात्री ८ वाजेपर्यंत सुरू राहील. संपर्क क्रमांक: ९०२२२४९५४३.

या क्लिनिकची स्थापना ११ वर्षांपेक्षा अधिक अनुभव असलेले त्वचारोगतज्ज्ञ डॉ. सुमित हजारे यांनी केली आहे. त्यांनी आयजीजीएमसी नागपूर येथून एमबीबीएस, जीएमसी नागपूर येथून एमडी (डर्मेटोलॉजी) पदवी पूर्ण केली असून, बेंगळुरू येथील क्युटिस हॉस्पिटलमधून डर्मेटोसर्जरीमध्ये फेलोशिप घेतली आहे. सध्या ते मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, नागपूर येथेही कार्यरत आहेत.

आपल्या संकल्पनेविषयी बोलताना डॉ. हजारे यांनी सांगितले की, द स्किन अबोड क्लिनिक येथे क्लिनिकल व बाल त्वचारोग, केस व नखांचे विकार, डर्मेटोसर्जरी, लेझर उपचार तसेच एस्थेटिक डर्मेटोलॉजी यांसारख्या सेवा नैतिक, परवडणाऱ्या आणि कौशल्याधारित पद्धतीने दिल्या जातील.

या क्लिनिकचे उद्घाटन २५ जानेवारी २०२६ रोजी जीएमसी नागपूरच्या त्वचारोग विभागाचे प्रमुख डॉ. जयेश मुखी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शहरातील नामांकित त्वचारोगतज्ज्ञ, विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ डॉक्टर, कुटुंबीय व मित्रपरिवार उपस्थित होता.

# इत्ती सी खुशी मालिकेत जेव्हा संजय अन्विताला थप्पड मारतो, तेव्हा अन्विता कठोर भूमिका घेत त्याला सोडून जाते

**मुंबई, १ फेब्रुवारी :** सोनी सबवरील इत्ती सी खुशी मालिकेत अन्विता (सुंबुल तौकीर खान) या निस्वार्थी तरुणीची कहाणी आहे, जी आपल्या भावंडांना आईच्या मायेने सांभाळते आहे. जीवनातील कठीण प्रसंगांमध्ये आपल्या कुटुंबाचा आधार बनण्यापासून ते प्रेम आणि विवाह यांच्यातील संतुलन सांभाळण्यापर्यंत अन्विताने नेहमीच आपल्या कुटुंबांच्या गरजांना प्राधान्य दिले आहे. आपला पती संजय (ऋषी सक्सेना) याच्यासोबत नवे जीवन घडवत असताना भूतकाळातील विराट (रजत वर्मा) मध्ये गुंतलेल्या तिच्या भावना पुन्हा पुन्हा उफाळून वर येत आहेत. आणि तीच्या क्षमतेची आणि दृढनिर्धाराची कसोटी होत आहे.

कहाणी पुढे सरकली आहे, आणि एक तणावपूर्ण स्थिती उभी राहिली आहे. ॲडव्होकेट लीना अन्विताच्या घरी अचानक भेट द्यायचे ठरवते. अन्विताची भावंडे सुरक्षित आणि पोषक वातावरणात वाढत आहेत की नाही हे बघण्याचा तिचा उद्देश असतो. हे आधीच ओळखून संजय हुशारीने ही परिस्थिती हाताळतो. आपल्या भावंडांचा ताबा तिला मिळण्यासाठी ती ऋषीवर विसंबून आहे, याची जाणीव तिला करून देण्याचा ऋषी पुरेपूर प्रयत्न करतो. तिने त्याला सोडून जाणे मूर्खपणाचे ठरेल हेही त्यातून सुचवतो. त्यानंतर लवकरच अन्विताच्या लक्षात येते की काहीतरी गडबड आहे, जेव्हा संजय तिला वारंवार फोन करून घरच्या क्षणा-क्षणाचेअपडेट देतो. तिला प्रश्न पडतो की त्याला हे सगळे कसे काय समजते आहे? सत्य शोधण्यासाठी ती दिया (मेघना कुकरेजा) आणि विराटची मदत घेते आणि जेव्हा तिला समजते की, संजयने एक सर्व्हेलन्स रूम बनवली आहे आणि भोसले आणि दिवेकरांचे घर आणि कॅफेमधील काना-कोपऱ्यावरत्याचे लक्ष आहे, तेव्हा तिला धक्का बसतो. संजय ती जाब विचारते, तेव्हा संजय हिंसक होतो आणि तिला थप्पड मरतो. अखेरीस अन्विता त्याचे घर सोडते आणि पुन्हा दिवेकरांच्या घरी येते.

हा संजय आणि अन्विताच्या नात्याचा शेवट आहे का की संजय पुन्हा तिच्या भावंडांच्या ताब्याचा मुद्दा पुढे करून तिची कोंडी करणार?

या कथानकाविषयी बोलताना सुंबुल तौकीर खान म्हणाली, अन्वितासाठी आपले कुटुंब एकत्र ठेवणे खूप महत्त्वाचे आहे. पण या क्षणाने तिचा सोशिकपणा संपला आहे. थप्पड मारल्यामुळे तिला केवळ शारीरिक वेदना झालेली नाही, तर तिचा विश्वास आणि स्वाभिमान हलून गेला आहे.

# मन अजून जेथे रेंगाळत आहे: सोनी सबचे कलाकार मोकळेपणाने सांगत आहेत आपले मूळ गाव, तिथली खाद्यसंस्कृती आणि सणासुदीच्या आठवणींविषयी

**मुंबई, १ फेब्रुवारी :** नवीन शहरात राहायचे म्हणजे बऱ्याचदा स्वप्नांचा पाठपुरावा, लांबलचक शूटिंगच्या वेळा आणि धकाधकीचे शेड्यूल, पण तरीही आपले घर नेहमी आपल्याला साद घालतच राहते. घरच्या आठवणी, तिथले स्वाद मानत रुंजी घालत राहतात. सोनी सबवरील कलाकार- ऋषी सक्सेना, दीक्षा जोशी, श्रेनु परीख, पूजा कातुर्डे आणि रजत वर्मा सांगत आपले मूळ गाव, आपल्या लहानपणीच्या आठवणी, कुटुंबाच्या परंपरा, सणासुदीचे विधी आणि काही अविस्मरणीय आठवणींबद्दल. या आठवणी हा त्यांचा भावनिक आधार आहेत, ज्या त्यांना सतत हे भान देतात की जगरहाटीत ते कितीही लांब गेले तरी मन नेहमीच घराकडे ओढ घेत असते.

इत्ती सी खुशी मालिकेत संजयची भूमिका करणारा ऋषी सक्सेना म्हणतो, जोधपूर शहरात मी घडलो. आजादेखील मी कोणत्याही शहरात काम करत असलो, तरी मी जेथे वाढलो त्या गल्ल्यांमध्ये माझे मन धाव घेते. तिथल्या छोट्या छोट्या गोष्टी मला खूप आठवतात. संध्याकाळच्या वातावरणात दरवळणारा मिरची वडाचा सुगंध, आईच्या हातची दाल-बाटी आणि जोधपूरची अंगभूत संथ, शांत लय. या सगळ्या गोष्टी मला फार आठवतात. आता, जेव्हा जेव्हा मी जोधपूरला जातो, तेव्हा माझ्या लहानपणाचा भाग असलेल्या ठिकाणी मी आवर्जून जातो. त्या मातीशी जुळतो. ह्या जागी गेल्यावर माझे जग विस्तारण्यापूर्वी आणि इतके व्यस्त होण्याआधी मी कोण होतो, ह्याचे स्मरण मला होते. लांब गेल्यावर मला जोधपूरचे मूल्य अधिक प्रकर्षाने जाणवते आहे. माझ्या कामाच्या निमित्ताने मी कुठेही गेलो, तरी माझ्यातील एक ऋषी नेहमी जोधपूरच्या गल्ल्यांमध्ये हुंदडत असतो.

गाथा शिव परिवार की गणेश कार्तिकेय मालिकेत पार्वतीची भूमिका करणारी श्रेनु परीख म्हणते, बडोदा माझ्या बालपणाचा सर्वात सुंदर भाग राहिला आहे. या शहराला संस्कारी नगरी म्हणतात, हे खरे सांस्कृतिक केंद्र आहे आणि आज मी जे काही आहे ते बडोदामुळेच आहे. मी अनेक सांस्कृतिक उपक्रमांमध्ये भाग घेतला; माझे अभिनय, नृत्य, गायन आणि अगदी मॉडेलिंगचे करिअर देखील इथेच सुरू झाले. या शहराने मला माझ्या आयुष्यातील काही अतिशय प्रिय आठवणी दिल्या आहेत, विशेषतः नवरात्रीच्या. कामामुळे मी कुठेही गेलो तरी, गरबा खेळण्यासाठी मी नेहमी घरी परतलो. मित्रांसोबत नवलखी ग्राउंडवर पहाटे ४ वाजेपर्यंत नाचणे ही एक परंपरा होती, आणि त्या दरम्यान मिळालेली बक्षिसे त्या रात्रींना आणखी खास बनवत. मी एका घट्ट बांधलेल्या कुटुंबात वाढलो आणि प्रत्येक मोठ्या भावाप्रमाणेच मी माझ्या धाकट्या भावावर, शुभमवर, खूपच संरक्षक होतो. सण हे नेहमी एकत्र येण्याचे प्रतीक होते. उत्तरायण म्हणजे मामाच्या घरी पतंग उडवणे, आणि सोबत चक्की, उंधियू आणि जलेबींनी भरलेले ताट. दिवाळी नानांच्या घरी साजरी व्हायची, जिथे आम्ही साध्या क्षणांचा आनंद घेत असू आणि फाफडा, चोराफळी, मठिया यांसारख्या पारंपरिक पदार्थांचा आस्वाद घेत असू. या आठवणी आजही माझ्या मनाच्या खूप जवळ आहेत, त्या माझ्यासाठी घराची खरी ओळख ठरतात..

पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत दीप्तीची भूमिका करणारी दीक्षा जोशी म्हणते, अहमदाबादेत घालवलेले लहानपण आणि सेंट झेवियर्स कॉलेजातील शिक्षणाने माझी अभिरुची आणि विचारसरणी घडवली. मला कॉलेजचे वातावरण इतके आवडायचे की, कधी बुट्टी मारावीशी वाटलीच नाही. ही अशी जागा होती, जिथे तुमच्या कुतुहलाला प्रोत्साहन दिले जात होते. स्वतः अहमदाबाद मला नेहमीच सळसळते आणि साधे वाटले आहे. रंगांपासून ते नवरात्रीची ऊर्जा आणि साबरमती रिव्हरफ्रंटवर अनुभवास येणारी शांतता, इथल्या बोळांमधली गंमत आणि या शहराची लय हे सारे अनोखे आहे. २०२१ मध्ये मी जेव्हा हँडपंप वापरतानाचे माझे लहानपणीचे फोटो शेअर केले, ते पाहून आता मला हसू येते की, इथले लहानपणीचे निरागस क्षण पुढे कसे मीम्स बनले. तुमचे शहर आणि लहानपणीच्या आठवणी सदैव तुमच्यापाशी राहतात. त्या तुम्हाला ऊब देतात, संस्कृती देतात आणि तुम्हाला घडवतात.

पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत प्रार्थनाची भूमिका करणारी पूजा कातुर्डे म्हणाली, मी पुण्याची आहे त्यामुळे मी नेहमी हिवाळ्याची वाट बघत असायचे. खास करून थंडीच्या दिवसातील पारंपरिक मराठी पदार्थ मला फार आवडायचे. माझ्या काही सुंदर आठवणीत माझी आजी प्रेमाने आमच्यासाठी तिळगूळ बनवायची त्या आठवणी आहेत. हे साधे साधे क्षण



आहेत जे आजही तुम्हाला ऊब आणि विसावा देतात. यशाकडे जाण्याचा माझा प्रवास मी कॉलेजात असताना सुरू झाला. माझ्या संस्थेने मला केवळ तांत्रिक ज्ञान दिले नाही, तर माझ्यातील आत्मविश्वास, शिस्त आणि संवाद कौशल्य वाढवले. हे गुण मनोरंजन क्षेत्रात आल्यानंतरही माझ्या कामी आले. या शहरातील सणवार आणि खाद्य पदार्थ यांच्याशी माझे घट्ट नाते आहे. गणेश चतुर्थीला दगडू शेठ हलवाई गणपतीचे दर्शन आणि मिसळ पावचा आस्वाद घेणे, म्हणजे अहाहा... एकाप्रकारे मी आज जी आहे, ती पुण्यानेच घडवली आहे.


## आज का अंदाज

### सोमवार २ फेब्रुवारी २०२६

| कल्याण बाजार पत्थर फोड एकच | मुंबई बाजार पत्थर फोड एकच |
|---|---|
| ३ - ६ - ७ - ० | ४ - ५ - ८ - ९ |
| १३९ - ६०० - ३७७ - ३७० | २३९ - ६९० - ४७७ - २७० |
| २५६ - १६९ - ४६६ - ४६० | ५९० - २७८ - ३४० - ४६९ |
| ३०० - २७७ - ४५८ - ५५० | ३३८ - ४५६ - ३६९ - ३७९ |
| जोडी | जोडी |
| ३१ - ६१ - ७८ - ०८ | ४३ - ५३ - ८२ - ९२ |
| ३९ - ६९ - ७४ - ०४ | ४० - ५० - ८७ - ९७ |
| ३२ - ६२ - ७५ - ०५ | ४१ - ५१ - ८६ - ९६ |

जबरदस्त पास होणारे चान्सेस २ फेब्रुवारी

### सोमवार २ फेब्रुवारी २०२६

सर्व बाजार साठी

१० - २० - ५९ - ८९
१६ - २६ - ५७ - ८७
१४ - २४ - ५३ - ८३
---------------------
१४६ - ४८० - १५९ - २८८
४७० - ५७० - २५८ - ३७८
३८० - ६६० - ३५७ - ४६८

सर्व बाजारांसाठी

| सोम. ते बुध. ओपन डे | | | सोम. ते बुध. ओपन नाईट | | |
|---|---|---|---|---|---|
| ३७० | ४७० | ६७० | २३४ | ४९९ | १५९ |
| ४६० ० | ३८० १ | ५८० ३ | ३७९ ९ | ५७० २ | २५८ ५ |
| ५५० | ५६० | ४९० | ४७८ | ६६० | ३५७ |

सर्व बाजारांसाठी

| सोम. ते बुध. क्लोज डे | | | सोम. ते बुध. क्लोज नाईट | | |
|---|---|---|---|---|---|
| ११० | ४०० | १६९ | ३४६ | १६० | २९९ |
| २०० २ | ३३८ ४ | २६८ ६ | ४९० ३ | ३४० ७ | ३८९ ० |
| ३९० | ५९० | ३६७ | ५८० | २५० | ४७९ |

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज
१ - २ - ३ - ९ - ०

जबरदस्त पास होणारे चान्सेस
प्रो. बालाजी कुमार 9822486034


## राशीभविष्य

**मेष :** आजचा दिवस काहीसा खर्चाचा असेल. परंतु तुम्ही प्रगतीच्या दिशेने वाटचाल कराल. आर्थिक नियोजन करणे गरजेचे आहे. तुम्ही सहलीचे नियोजन करू शकता.

**वृषभ :** आरोग्याकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे; बाहेरील अन्नपदार्थ टाळावे. कौटुंबिक बाबींवर खर्च होऊ शकतो. विद्यार्थ्यांना मानसिक तणावातून दिलासा मिळेल. कुटुंबाकडून तुम्हाला पूर्ण पाठिंबा मिळेल.

**मिथुन :** खर्चाचे प्रमाण आज जास्त राहील. कार्यक्षेत्रात काही नवीन आव्हाने समोर येऊ शकतात. संपत्तीत वाढ झाल्याने मन प्रसन्न राहील, व्यावसायिक कामात काहीसा विलंब होण्याची शक्यता आहे.

**कर्क :** मुलांच्या उच्च शिक्षणासाठी परदेशाचे योग जुळून येतील. जुने आर्थिक व्यवहार समस्या निर्माण करू शकतात, मात्र महत्त्वाच्या व्यक्तींशी गाठीभेटी होतील. निर्णयक्षमतेत सुधारणा होईल.

**सिंह :** मित्रांशी संबंध दृढ होतील. धार्मिक कार्यात तुमचा रस वाढेल. मानसिक ताण कमी होईल. प्रलंबित कामे पूर्ण झाल्याने दिलासा मिळेल. मतभेद संवादाने सोडवण्याचा प्रयत्न करा.

**कन्या :** आजचा दिवस तुमच्यासाठी प्रलंबित कामे पूर्ण करण्याचा असेल. ज्यामुळे तुम्हाला मोठा आनंद मिळू शकतो. मात्र, स्वभाव काहीसा चिडचिडा होईल. त्यामुळे अनावश्यक राग टाळणे हिताचे ठरेल.

**तूळ :** गमावलेले पैसे परत मिळतील. त्यामुळे उत्पन्नात वाढ होईल. भागीदारीत व्यवसाय करण्याची संधी मिळू शकते.

**वृश्चिक :** एखादी इच्छा पूर्ण झाल्याने तुम्ही धार्मिक तीर्थयात्रेला जाऊ शकता. मुलांच्या संगतीवर लक्ष ठेवणे आवश्यक आहे. कुटुंब आणि मित्रांची साथ लाभेल. प्रकृतीकडे लक्ष पुरविणे आवश्यक आहे.


**धनु :** कुटुंबातील सदस्यांशी वाद होण्याची शक्यता आहे. त्यामुळे बोलताना संयम ठेवा. घराचे नूतनीकरण किंवा वैयक्तिक गरजांवर खर्च होऊ शकतो. कुटुंबात एकजुटीचे वातावरण राहील.

**मकर :** आजचा दिवस छंद जोपासण्यासाठी आणि आनंदासाठी खरेदी करण्याचा आहे. बोलण्यावर आणि वागण्यावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. मित्राकडून एखादी चांगली बातमी मिळेल.

**कुंभ :** कुटुंबातील सदस्यांसोबत आजचा वेळ आनंदात जाईल. तुमच्या मनातील नवीन कल्पनांमुळे घरातील वातावरण सकारात्मक राहील. घरात शुभ कार्याचे संकेत आहेत. आत्मविश्वास वाढलेला असेल.

**मीन :** तुमची हरवलेली प्रिय वस्तू आज सापडण्याची शक्यता आहे. प्रेमात असलेले व्यक्ती जोडीदारासोबत प्रवासाचा बेत आखू शकतात. कामाच्या ठिकाणी तुमच्या कार्याचा गौरव होईल.

## शब्दकोडे क्रमांक २३४२



**उभे शब्द :-**
१) रावणाच्या पत्नीचे नाव
२) नगर
३) झाकणाचे पात्र
४) नसता संबंध जोडणे (वा.प्र.)
५) सत्वांश
६) कडबा चारा इ.गुरांचे खाणे
७) पुष्कळ
८) गणितातील उणे
१०) बोलणारा पक्षी
१३) अनेक शतके
१४) एकावर एक रचलेले, स्तर
१६) रोपे तयार करण्याचा मळा
१९) युवक
२१) पदार्थ ढवळण्याचे छोटे साधन
२२) हृदय (हिं.)
२४) पात्याचे तीक्ष्णता
२६) वावडी
२८) पंख, दुसरा
२९) वरपांगी
३०) अत्यंत हळू हळू
३३) दुष्ट, भांडखोर
३५) पूर्ण ऐक्य
३६) रसाळ, रसपूर्ण
३७) विश्वातील सर्व भाग
३८) सततचा मागणीचा हट्ट
३९) सोन्याचा धागा
४२) मध्यम प्रमाण
४४) जमा करणे, गोळा करणे
४६) बुद्धिबळातील प्रधान
४७) धातूचा धागा
५०) गोमाता
५१) वजन
५२) मोठी उथळ वाटी
५३) गाडीचे छत.

**आडवे शब्द :-**
१) सांगा कसं जगायचं सारं काही स्वत:साठी सलाम ह्या कवितांचा कवी, ज्यांचे नुकतेच निधन झाले
६) द्वेष, सूडाची भावना
९) मच्छर
१०) मूल, बालक
११) भूपती
१२) श्रीरामाचे वडील
१५) इंद्राणी, इंद्राच्या पत्नीचे नाव
१६) झाड किंवा दूषण लावणे
१७) पद्धत
१८) रममाण, निमग्न
२०) त्वचेचा पापुद्रा
२१) उसाचा रस काढण्याचे यंत्र
२३) खिशातील चौकोनी वस्त्र
२४) निवासस्थान
२५) तीर कमान
२७) भटक्या, न भिता रात्री भटकणारा
३१) हाताचा कोना
३२) स्वीकारणे
३३) गीत
३४) कमीतकमी
३५) उंच-सखल नसलेले
३७) पादत्राण
३९) लोकांचा घोळका
४०) अंगारखा
४१) प्रेत
४२) पावसाची झड
४३) शरम
४५) तळपायाचा एक भाग
४७) चांदणी
४८) नियम, व्रत, लक्ष्य
४९) नगारा वाजविणारा
५२) सकटनिकट, न निवडता एकत्र
५४) कमालीची शुष्कता
५५) धावणे.

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# कॅलिडोस्कोप

## ३५ वर्षांनी जमिनीवर!



जगभरात अनेक रहस्यमय आणि अंगावर काटा आणणाऱ्या कथा बघायला मिळत आहेत. त्यात काही कथा विज्ञानाच्या पलीकडच्या आहेत, तर काही मानवी कल्पनाशक्तीला आव्हान देणाऱ्या आहेत. सँटियानो फ्लाइट ५१३ विमानाची कथा केवळ विमान अपघाताची नाही, तर वेळेच्या गूढाशी जोडलेली असल्याचे मानले जाते.

मिळालेल्या माहितीनुसार, सँटियानो फ्लाइट ५१३ हे विमान १९५४ साली दक्षिण अमेरिकेतील सँटियागो येथून उड्डाण घेऊन ब्राझीलमधील पोर्टो एलेग्रे येथे जाणार होते. साधारण १८ तासांचा प्रवास करून हे विमान आपल्या ठरलेल्या ठिकाणी पोहोचणे अपेक्षित होते; मात्र अटलांटिक महासागरावरून जात असताना हे विमान अचानक रडारवरून गायब झाले. विमानाचा कोणताही संपर्क न झाल्याने आणि कुठलाही अपघातस्थळाचा पुरावा न मिळाल्याने अधिकाऱ्यांनी हे विमान समुद्रात कोसळले असावे असा अंदाज लावला. हे विमान शोधण्यासाठी शोधमोहीम राबवण्यात आली; पण काहीही हाती लागले नाही. त्यानंतर अखेर हे प्रकरण बंद करण्यात आले; मात्र तब्बल ३५ वर्षांनंतर म्हणजेच १९८९ मध्ये सर्वांना धक्का बसला. हेच विमान अचानक ब्राझीलमधील पोर्टो एलेग्रे विमानतळावर उतरले. आश्चर्याची गोष्ट म्हणजे विमानाची रचना आणि क्रमांक हे १९५४ मधीलच होते.

## छत्तीसगडमध्ये सापडली रहस्यमयी गुहा



छत्तीसगडमध्ये भारतातील सर्वात रहस्यमयी गुहा सापडली आहे. या गुहेत हिरव्या रंगाचे चमकणारे दगड तरंगताना दिसत आहेत. या गुहेत संशोधन सुरू असून लवकरच ही गुहा पर्यटकांसाठी खुली होणार आहे. पर्यटन नकाशावर हिरव्या गुहेचा समावेश केल्याने कांगेर व्हॅली राष्ट्रीय उद्यानात पर्यटनाला एक नवीन आयाम मिळेल. स्थानिक रोजगाराच्या संधी वाढतील आणि प्रादेशिक विकासाला गती मिळेल.

या गुहेला हिरवी गुहा असे नाव देण्यात आले आहे. ही गुहा भारतातील सर्वात रहस्यमयी पर्टनस्थळ ठरणार आहे. छत्तीसगड मधील कांगेर व्हॅली राष्ट्रीय उद्यान हे त्याच्या अद्भुत नैसर्गिक सौंदर्यासाठी, समृद्ध जैवविविधतेसाठी आणि जगप्रसिद्ध पर्यटन स्थळांसाठी देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध आहे. वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले, की घनदाट जंगलांमध्ये वसलेली ही गुहा अद्वितीय रचनेमुळे आणि नैसर्गिक सौंदर्यामुळे एक नवीन पर्यटक आकर्षण बनू शकते. गुहेपर्यंत पोहोचण्याचा रस्ता कठीण आहे. हिरव्या गुहेकडे जाणारा मार्ग मोठ्या दगडांमधून जातो. गुहेत प्रवेश केल्यावर, सूक्ष्मजीवांच्या साठ्यांनी झाकलेल्या हिरव्या भिंती पर्यटकांना आकर्षित करतात. गुहेत प्रवेश केल्यावर एक मोठा कक्ष उघडतो. इथे चमकदार आणि भव्य स्टॅलेक्टाइट्स आणि फ्लोस्टोन (वाहत्या पाण्याने तयार झालेले दगडांचे थर) पहायला मिळतात. हे गुहेच्या नैसर्गिक वैभवात आणखी भर घालतात. कोटुमसर कॉम्प्लेक्सच्या कंपार्टमेंट क्रमांक ८५ मध्ये हिरवी गुहा आहे. गुहेच्या भिंती आणि छत हिरव्या सूक्ष्मजीवांनी भरलेले आहे. त्यामुळे या गुहेला 'हिरवी गुहा' असे नाव मिळाले आहे. चुनखडी आणि शेलपासून बनलेली ही गुहा कांगेर खोऱ्यातील सर्वात दुर्मिळ आणि अद्वितीय गुहांपैकी एक मानली जाते.

वन विभाग गुहेची सुरक्षा आणि नियमित देखरेख सुनिश्चित करत आहे. शिवाय, पर्यटकांच्या सोयीसाठी प्रवेश रस्ते, पदपथ आणि इतर आवश्यक पायाभूत सुविधांचा विकास सुरू आहे. कांगेर व्हॅली राष्ट्रीय उद्यानात पर्यटनाला चालना देण्यासाठी वन विभाग सतत प्रयत्न करत आहे.

## गायब झाली ट्रेन



जगात विश्वास बसू न शकणाऱ्या अनेक घटना घडल्या आहेत. अजूनही अनेक रहस्य उलगडलेली नाहीत. बर्म्युडा ट्रँगलमध्ये अनेक जहाजं आणि विमानं गायब झाली आहेत. अजूनही त्यांचा थांग लागलेला नाही. १९११ मध्ये अशीच एक घटना घडली होती. त्यात १०६ प्रवाशांना घेऊन जाणारी ट्रेन बोगद्यात शिरली खरी पण ती बाहेर आलीच नाही. आतल्या आत कुठेतरी गायब झाली. पुढे ट्रेनचं काय झालं हे अद्यापही कोणाला कळलेलं नाही. ही रोमांचकारी घटना रोममधली आहे. जेनेटी नावाची ही ट्रेन रोमन स्टेशनवरून निघाली. ट्रेनच्या मार्गात एक बोगदा होता. ट्रेन या बोगद्यात शिरली खरी पण बाहेर आलीच नाही. ट्रेनचा बराच शोध घेण्यात आला. पण ती कोणालाही सापडली नाही. घटनेनंतर ट्रेनमधले दोन प्रवासी बोगद्याबाहेर सापडले. त्यांनी सांगितलं ते ऐकून अनेकांना धक्काच बसला. ट्रेन बोगद्याजवळ येऊ लागल्यावर आतून धूर येऊ लागला. हा धूर अगदी विचित्र होता. तो बघून हे दोन प्रवासी खूप घाबरले आणि त्यांनी ट्रेनमधून उडी मारली. यानंतर ट्रेन बोगद्यात शिरली आणि गायब झाली. ही ट्रेन ७१ वर्ष मागे म्हणजे भूतकाळात गेली असल्याची चर्चा होती. ही सगळी भुताटकी असल्याचं काही लोक सांगतात. ही ट्रेन मेक्सिकोत १८४० च्या काळात पोहोचली असल्याचं बोललं जातं. मेक्सिकोतल्या एका रूग्णालयात १०४ लोकांना दाखल करण्यात आलं होतं. पण ते सगळे वेडे झाले होते, असं मेक्सिकोतल्या एका डॉक्टरने सांगितलं होतं. आपण ट्रेनने इथे आल्याचं त्यांचं म्हणणं होतं. पण रोमहून मेक्सिकोला जाणारी कोणतीही ट्रेन त्या काळात अस्तित्त्वात नव्हती. त्यामुळे या ट्रेनचं नेमकं काय झालं, हे कोणालाही माहीत नाही. हा प्रकार म्हणजे एक चमत्कारच म्हटला पाहिजे.

## हनुमान मंदिराला कुत्र्याच्या प्रदक्षिणा



उत्तर प्रदेशातील बिजनौर जिल्ह्यातील लोकांना नुकतेच श्रद्धेचे एक अनोखे दृष्य दिसले. नंदपूर गावातील एका प्राचीन हनुमान मंदिरात एक कुत्रा बजरंगबलीच्या मूर्तीला प्रदक्षिणा घालत होता. कुत्र्याची प्रदक्षिणा पाहण्यासाठी दूरदूरचे लोक जमत आहेत. गर्दी नियंत्रित करण्यासाठी पोलिस तैनात करण्यात आले आहेत.

स्थानिकांचे म्हणणे आहे, की कुत्रा तीन ते चार दिवसांपूर्वी पहाटे ४ वाजता मंदिर परिसरात आला आणि न थांबता हनुमानाच्या मूर्तीला प्रदक्षिणा घालू लागला. लोकांचे म्हणणे आहे, की परिक्रमेदरम्यान हा कुत्रा खात नाही किंवा पाणी पीत नाही. लोकांनी कुत्र्यासाठी जेवण आणि पाण्याची व्यवस्थाही केली; पण कुत्र्याने काहीही खाल्ले नाही आणि प्यायले नाही.

एक कबुतरदेखील कुत्र्यासोबत प्रदक्षिणा करत होते. लोक म्हणतात, की कबुतर कुत्र्याच्या वर बसून प्रदक्षिणा करत होता, परंतु कबुतराचा मृत्यू झाला, त्यानंतर कुत्र्याने त्याची प्रदक्षिणा थांबवली. या वेळी कुत्रा भावूकही झाला.

## ...म्हणून होतात मृत्यू



जगभरात अनेक धार्मिक स्थळं आहेत. त्या ठिकाणांशी संबंधित काही कथा आहेत. रहस्य आहेत. अशाच एका ठिकाणाला 'नरकाचा दरवाजा' म्हटलं जातं. मंदिरात गेलेला माणूस कधीच परत येत नाही. इथे गेलेल्या लोकांचा मृत्यू होतो. तो कशामुळे होतो याचा शोध लावण्यात आपल्याला यश आल्याचं संशोधकांचं म्हणणं आहे. दक्षिण तुर्कीतल्या हिरापोलीस शहरात अत्यंत प्राचीन असं एक मंदिर आहे. या ठिकाणी येणाऱ्या लोकांचा मृत्यू होतो. या मृत्यूंमागचं कारण कोणालाही माहीत नाही. त्यामुळे या मंदिराला नरकाचं द्वार असं म्हटलं जातं. इथे येणारे पशूपक्षीही मृत्यू पावत असत. युनानी देवतेच्या विषारी श्वासांमुळे माणसांचा तसंच पशूपक्ष्यांचा मृत्यू होत असल्याचं बोललं जात असे. पण अशाप्रकारे होणाऱ्या मृत्यूंमागे शास्त्रीय कारण असल्याचं संशोधकांचं म्हणणं आहे. मंदिराच्या मागच्या भागातून कार्बन डाय ऑक्साइड बाहेर पडत आहे. या भागात कार्बन डाय ऑक्साइडचं प्रमाण खूप जास्त असल्याचं संशोधकांचं म्हणणं आहे. पृथ्वीच्या गर्भातून विषारी वायू बाहेर पडत असल्याने इथे येणाऱ्या लोकांचा मृत्यू होत असावा. मंदिराच्या खालच्या बाजूच्या गुहेत कार्बन डाय ऑक्साइडचं प्रमाण खूप जास्त असल्याचं शास्त्रज्ञांना आढळून आलं आहे. या गुहेतून येणाऱ्या वाफेमुळे पशुपक्षी तसंच अन्य जीवांचा मृत्यू होतो. भरपूर बाष्प असल्यामुळे जमीनही नीट दिसत नाही. त्यामुळेही लोक फसतात आणि अपघात घडतात.

## दरवाजा उघडताच उडाली होती खळबळ

विमान विमानतळावर उतरले आणि दरवाजा उघडला तेव्हा आतमधील दृश्य पाहून सर्वांनाच धक्का बसला. विमानातील सर्व प्रवासी आपापल्या सीटवर होते; मात्र त्यांचे फक्त सापळे तिथे होते. या विमानाचा पायलटदेखील त्याच्या जागेवर होता. या विमानामध्ये ना आग लागली ना कोणताही अपघात झाल्याची गोष्ट दिसून आली.

या घटनेनंतर जगभरात अनेक तर्क-वितर्क सुरू झाले. काहींनी ही घटना टाइम ट्रॅव्हलशी संबंधित असल्याचे म्हटले, तर काहींनी ही कथा पूर्णपणे अफवा असल्याचे म्हटले. आजपर्यंत या घटनेबाबत सरकारी किंवा विमान वाहतूक संस्थेकडून कोणताही अधिकृत ठोस पुरावा उपलब्ध झालेला नाही.



## जनावरांच्या गळी सोन्याच्या सरी

बऱ्याच घरांमध्ये पाळीव प्राण्यांचे खूप लाड होतात. लाडक्या कुत्र्याला किंवा मनीमाऊला छान छान कपडे घातले जातात. त्यांना पार्लरमध्ये नेलं जातं. प्राण्यांची काळजी घेण्यासाठी प्राणीप्रेमी बरंच काही करत असतात. प्राण्यांच्या रक्षणासाठी बरीच आंदोलनं होतात. पण अनंत सिंह नामक आमदार अनोखे आहेत. प्राण्यांवरील प्रेमापोटी ते त्यांना सोन्याने मढवतात. गायी-म्हशींच्या गळ्यात सोनसाखळ्या घालतात. सोनपूरमध्ये जगातल्या सर्वात मोठ्या पशूमेळ्याचं आयोजन केलं जातं. अनंत सिंह या मेळ्यात पोहोचले आहेत. ते बिहार विधानसभेतले आमदार असून भलतेच लोकप्रिय आहेत. मेळ्यात येणारे लोक अनंत सिंह यांच्या शिबिरात दाखल होतात. सिंह यांनी आपल्या शिबिरातल्या प्रत्येक जनावराच्या गळ्यात २०० ते २५० ग्रॅमची सोन्याची चेन घातली आहे. आमदारांच्या या शिबिरात तीन घोडे, एक हत्ती आणि काही गायी आहेत. सगळ्या जनावरांच्या गळ्यातल्या दागिन्यांचं वजन अडीच किलोच्या आसपास आहे. आजघडीला त्याची किंमत ७५ लाख रूपयांच्या घरात जाते. या जनावरांच्या खाण्यापिण्याची विशेष काळजी घेतली जाते. चाऱ्यासोबतच त्यांना ताजी फळं आणि दूध दिलं जातं. त्यांच्याकडील हत्ती दररोज २० किलो सफरचंद खातो. दिवसाला जवळपास ५० हजार रूपये पशूंच्या आहारावर खर्च केले जातात. त्यांच्या देखभालीसाठी ५० लोक तैनात आहेत.





## समुद्राला न मिळणारी नदी!

लुनी ही नदी कधीही समुद्राला मिळत नाही. या नदीचा उगम राजस्थानमधील अजमेर जवळील अरवली पर्वतरांगांमधील 'नागा' टेकड्यांवर होतो. ती राजस्थानमधून वाहत गुजरातमध्ये प्रवेश करते.

ही नदी कोणत्याही समुद्राला मिळण्याऐवजी गुजरातच्या कच्छच्या रणात जाऊन लुप्त होते. कच्छचे रण हे एक दलदलीचे वाळवंट आहे, तिथे ही नदी स्वतःचे अस्तित्व संपवते. 'लुनी' हे नाव संस्कृत शब्द लवणवरी' (खारे पाणी) वरून आले आहे. उगमस्थानी हे पाणी गोड असते; पण बाडमेर जिल्ह्यातील बालोतरा येथे पोहोचल्यावर ते अत्यंत खारे बनते, कारण तेथील जमिनीतील क्षारांचे प्रमाण जास्त आहे.

ही एक हंगामी नदी आहे. पावसाळ्यात यात मोठ्या प्रमाणात पाणी असते; मात्र उन्हाळ्यात कोरड्या हवामानामुळे ती अनेक ठिकाणी आटते. वाळवंटी भागातील लोकांसाठी ही नदी जलसंजीवनी मानली जाते. राजस्थानच्या पश्चिम भागात शेती आणि पशुपालनासाठी या नदीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

## ... आणि त्याला पर्स मिळाली

पर्स चोरीला गेल्यास आपण खूप अस्वस्थ होतो. कारण पर्समध्ये रोख रकमेबरोबरच महत्त्वाची कागदपत्रं तसंच डेबिट, क्रेडिट कार्ड असतात. त्यांचा गैरवापर होऊ नये यासाठी धावपळ सुरू होते. पण हरवलेली पर्स व्यवस्थित परत मिळाली तर? इतकंच नाही तर पर्समध्ये आपल्याला जास्तीचे पैसेही मिळाले तर? आधीच पर्स मिळण्याची शक्यता कमी. मग त्यात जास्तीचे पैसे कोण देणार, हा प्रश्न तुमच्या मनात उपस्थित झाला असेल. पण ओहामाचा रहिवासी असणाऱ्या एका व्यक्तीच्या बाबतीत असं घडलं आहे. त्याचं झालं असं की, बहिणीच्या लग्नासाठी या व्यक्तीला लास वेगासला यायचं होतं. तो विमानाने लास वेगासला आला. हंटर शैमत्त असं या व्यक्तीचं नाव आहे. तो २० वर्षांचा आहे. खिसे तपासल्यानंतर आपली पर्स कुठेतरी हरवल्याचं त्याच्या लक्षात आलं. पर्समध्ये ६० डॉलर रोख, ४०० डॉलरचा चेक, बँक कार्ड आणि ओळखपत्र होतं. ओहामाहून वेगासला येताना विमानात पर्स विसरली असेल असं वाटून त्याने कंपनीला संपर्क केला. पर्स हरवल्यामुळे हंटरला बराच त्रास सहन करावा लागला. तो कसाबसा ओहामाला पोहोचला. पण घरी पोहोचल्यानंतर दोन दिवसांच्या आत त्याला पर्स परत मिळाली. पोस्टाने ती त्याच्यापर्यंत पोहोचली होती. इतकंच नाही तर पर्समध्ये ६० नाही तर १०० डॉलर होते. त्यात त्याला एक चिठ्ठीही सापडली. पर्स पाठवणाऱ्याने ही चिठ्ठी लिहिली होती. टोड ब्राउन नावाच्या इसमाने ही पर्स हंटरला परत दिली होती.



पर्स मिळाल्याचा आनंद साजरा करता यावा म्हणून टोडने त्यात थोडे जास्तीचे डॉलरही ठेवल होते. विमानात त्याला ही पर्स मिळाली होती. पर्स मिळाल्यामुळे हंटरला खूप आनंद झाला आहे.

## सांतानं भरलं बिल

तुम्ही एखाद्या शॉपिंग मॉलमध्ये गेला, भरपूर खरेदी केली आणि त्याचं बिल कोणी दुसऱ्यानेच भरलं तर... काय मज्जा येईल ना! अमेरिकेतल्या वॉलमार्टमध्ये खरेदी करणाऱ्या लोकांना नुकताच हा अनुभव आला. इथल्या डर्बी शहरातल्या वॉलमार्ट सुपरमार्केटमध्ये बरेच लोक खरेदीसाठी आले होते. त्याच वेळी एक घोषणा करण्यात आली. इथे आलेल्या प्रत्येक ग्राहकाचं बिल आपण भरणार असल्याचं एका माणसाने जाहीर केलं. ही घोषणा ऐकल्यानंतर सर्वांच्या चेहऱ्यावर आश्चर्याचे भाव उमटले. ही व्यक्ती कोण आहे आणि ती असं का करत आहे असा प्रश्न सर्वांना पडला होता. त्या व्यक्तीने आपण सांताक्लॉज असल्याचं सगळ्यांना सांगितलं. खरी ओळख सांगितली नाही. पण सांताक्लॉज बनून त्याने सर्वांची बिलं चुकती केली. या सांताक्लॉजने ख्रिसमसपूर्वीच सर्वांना भेटी दिल्या. हा माणूस कोण होता आणि त्याने असं का केलं असावं, हे अद्याप गुलदस्त्यातच आहे.



# भाजपच्या १०२ नगरसेवकांचे राजीनामे

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १ :

नागपुरात महापौरपदासाठी ६ फेब्रुवारीला निवडणूक होणार आहे. महापौरपदासाठी ज्येष्ठ नगरसेविका नीता ठाकरे यांच्या नावावर केंद्रीयमंत्री नितीन गडकरी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यात एकमत झाल्याचे सूत्राने नमुद केले. मात्र महापौरपदाच्या निवडणुकीपूर्वीच भाजपच्या निवडून आलेल्या सर्व १०२ नगरसेवकांनी राजीनामे दिले. सर्व नगरसेवकांनी गटनेते बाल्या बोरकर यांच्या सूचनेनुसार राजीनामे दिले.

महापालिकेतील सत्तापक्ष नेतेपदी स्थायी समितीचे माजी अध्यक्ष व ज्येष्ठ नगरसेवक बाल्या उपाख्य नरेंद्र बोरकर यांची शनिवारी नियुक्ती करण्यात आली. महाल येथील रजवाडा पॅलेसमध्ये पार पडलेल्या नगरसेवकांच्या बैठकीत शहर भाजपाध्यक्ष दयाशंकर तिवारी यांनी याबाबत घोषणा केली. ज्येष्ठ नगरसेवकांसह काही तरुण नवे चेहरेही निवडून आले आहे. महापालिकेच्या कामाची त्यांना माहिती व्हावी, यासाठी प्रशिक्षण वर्ग घेण्यात येईल, असे बाल्या बोरकर यांनी नियुक्तीनंतर सांगितले. याशिवाय त्यांनी सर्व १०२ नगरसेवकांचे राजीनामे घेतल्याचे सांगितले. गतवेळीप्रमाणे भाजपने सर्व १०२ नगरसेवकांकडून राजीनामापत्र लिहून घेतले आहे. पक्ष विरोधी कारवाई किंवा इतर अनुचित प्रकारात कुणी आढळून आल्यास त्यांच्यावर तातडीने कारवाई करण्यासाठी हे राजीनामे घेण्यात आल्याची माहिती आहे.

गटनेते बोरकर यांच्या सूचनेनुसार नगरसेवकांनी राजीनामे लिहून दिले आहेत. हा पक्षाअंतर्गत आचारसंहितेचा एक भाग असल्याचे बोरकर यांनी स्पष्ट केले. शहरातील नागरिकांनी दजेर्दार नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर दिला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. सवार्नुमते सत्तापक्ष नेते म्हणून बाल्या बोरकर यांच्या नावाला पसंती देण्यात आली. बाल्या बोरकर यांच्यावर यापूर्वी भाजपने महापालिकेत स्थायी समिती अध्यक्ष, परिवहन समिती सभापती व पक्षाचे उपनेते म्हणून जबाबदारी दिली होती.

त्यांनी ती यशस्वीरित्या पार पाडली. बाल्या बोरकर पूर्व नागपुरातील प्रभाग क्रमांक २३ मध्ये सर्वसाधारण प्रवगार्तून निवडून आले. त्यांनी आपल्या पहिल्याच निवडणुकीत माजी महापौर नरेश गावंडे यांचा पराभव केला होता. महापालिका सभेचे संचालन, कामाचा अनुभव आणि नगरसेवकांसोबत समन्वयाची भूमिका या आधारावर बाल्या बोरकर यांची नियुक्ती करण्यात आल्याचे शहर भाजप अध्यक्ष दयाशंकर तिवारी यांनी सांगितले.

राज्याची उपराजधानी नागपूरच्या आठव्या महिला महापौर म्हणून निता ठाकरे यांची भाजपच्या संसदीय मंडळाने निवड केल्याचे सुत्राने नमुद केले. शुक्रवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांच्यात झालेल्या बैठकीत आमदार मोहन मते यांनी दक्षिण नागपूरला महापौरपद मिळावे, यासाठी आग्रह धरला होता. बैठकीनंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी महापौरांचे नाव गुलदस्त्यात ठेवले. त्यामुळे दक्षिण नागपुरातील निता ठाकरे की दिव्या धुरडे असा प्रश्न सर्वांना पडला होता.

शुक्रवारी केंद्रीयमंत्री नितीन गडकरी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या बैठकीनंतर आज, शनिवारी नगरसेवकांची बैठक महाल येथील रजवाडा पॅलेसमध्ये पार पडली. या बैठकीत महापौर म्हणून निता ठाकरे यांच्याच नाव अंतिम झाल्याचे सूत्राने सांगितले. एवढेच नव्हे तर उपमहापौरपदी अॅड. संजय बालपांडे तर स्थायी समिती अध्यक्ष म्हणून शिवानी दाणी यांना जबाबदारी देण्यात येणार असल्यची पुस्तीही सुत्राने जोडली. आज रविवारी सायंकाळी शहर भाजप अध्यक्ष दयाशंकर तिवारी यांनी पत्रकारपरिषदेचे आयोजन केले असून यात महापौर, उपमहापौरांच्या नावाची घोषणा करण्याची शक्यता आहे.

शुक्रवारी केंद्रीयमंत्री नितीन गडकरी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यात झालेल्या बैठकीतच महापौरांचे नाव ठरल्याचे सुत्राने नमुद केले. विशेष म्हणजे काल, शुक्रवारी नागपूर नगरीचे प्रथम महापौर बॅरिस्टर शेषराव वानखेडे यांची पुण्यतिथी होती. नेमके याच दिवशी शहराचा ५५ व्या महापौरांचे नाव निश्चित झाले. त्यांच्या कन्या कुंदा विजयकर यांना नागपूर नगरीच्या पहिल्या महिला महापौर होण्याचा मान मिळाला होता. त्यानंतर कल्पना पांडे, वसुंधरा मासुरकर, पुष्पा घोडे, माया इवनाते, अर्चना डेहनकर, नंदा जिचकार या ७ महिला महापौरांनी आपल्या कार्याची छाप पाडली.

# भरधाव कारची ॲपेला धडक; महिला ठार

■ महासागर प्रतिनिधी
बुलढाणा, दि. १ :



जिल्ह्यातील लोणार तालुका रविवारी (१ फेब्रुवारी) रोजी झालेल्या भीषण अपघाताने हादरला. महिला मजुरांना कामावर घेऊन जाणाऱ्या ॲपेला भरधावं वेगाने जाणाऱ्या कारने धडक दिल्याने हा अपघात झाला. यामध्ये एका मजूर महिलेचा जागीच मृत्यू ओढावला तर किमान ८ महिला मजूर जखमी झाल्या आहे. यातील काही महिलांची प्रकृती गंभीर असून त्यांच्यावर नजिकच्या शासकीय रुग्णालयात उपचार करण्यात येत आहे.

लोणार तालुक्यातील लोणार ते मातळ मार्गावर आज १ फेब्रुवारी रोजी सकाळी हा भीषण अपघात घडला. भरधाव वेगात येणाऱ्या स्विफ्ट डिझायर कारने महिला मजुरांना घेऊन जाणाऱ्या ऑटोला जोरदार धडक दिली. या अपघातात एका महिलेचा जागीच मृत्यू झाला असून आठ जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमीची संख्या जास्त असण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

लोणार तालूक्यातील किनगावजट्टू येथून मातळ या गावाकडे नेट शेड च्या कामासाठी महिला मजूर ॲपे (क्रमांक एम एच २८ आर २२११) ने जात होत्या. बाजड यांच्या शेताजवळील वळणावर सरस्वती गावाच्या च्या दिशेने भरधाव वेगात येणाऱ्या स्विफ्ट डिझायर कार (क्रमांक एम एच ४३ एएफ ५८२१) ने ॲपेला समोरून धडक दिली.कारची धडक इतकी जोरदार होती की धडकेमुळे ॲपे पलटला व त्यातील महिला मजूर रस्त्याच्या कडेला फेकल्या गेल्या.

या अपघातात जरीनाबी अयुबशहा (वय ४५) यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. रंजना जना परमेश्वर कास्तोडे (वय ५३), शांताबाई शेवाळे (वय ४५), कल्पना विठ्ठल जमधाडे (वय ४०), अलका मधुकर शेवाळे (वय ४०), लक्ष्मण बबन करवते (वय ४५), चंद्रभागा गजानन नागरे (वय ४०), राधा गजानन नागरे तसेच ॲपे चालक आसिफ निंशालशहा (वय ३०) हे आठ जण गंभीर जखमी झाले आहेत. अपघातानंतर स्विफ्ट डिझायर कारचा चालक घटनास्थळावरून फरार झाला. सदर वाहन हे हिवराखंड येथील असल्याची माहिती मिळाली आहे. जखमींना तातडीने १०८ रुग्णवाहिकेद्वारे लोणार ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. अतिगंभीर जखमींना पुढील उपचारासाठी बुलढाणा येथे हलविण्यात आले आहे. या घटनेची माहिती मिळताच लोणार पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून फरार चालकाचा शोध सुरू आहे. अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## सीसीटीव्ही नसलेल्या केंद्रावर शिक्षक, कर्मचाऱ्यांची अदलाबदली

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. १ :

कॉपीमुक्त अभियानांतर्गत पारदर्शक पद्धतीने दहावी व बारावीची परीक्षा होण्यासाठी सरसकट सर्वच केंद्रांवरील शिक्षक, कर्मचाऱ्यांची अदलाबदली करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. याला विरोध झाल्यानंतर त्यामध्ये आता फेरबदल करून आता सीसीटीव्हीची नजर नसलेल्या केंद्रावर कर्मचाऱ्यांची अदलाबदली केली जाणार आहे. या संदर्भात राज्य शिक्षण मंडळाचे सचिव डॉ. दीपक माळी यांनी सर्व विभागीय सचिवांना आदेश दिले आहेत.

राज्यभर १० फेब्रुवारीपासून बारावीच्या परीक्षा सुरू होत असून एकूण ३३७३ केंद्रावर परीक्षा घेतल्या जाणार आहेत. दहावीच्या परीक्षा २० फेब्रुवारीपासून सुरू होणार असून त्यासाठी एकूण ५१३० केंद्र राहतील. या परीक्षा कॉपीमुक्त व्हाव्यात यासाठी शासनाने अनेक उपाययोजना केल्या आहेत. यामध्ये प्रामुख्याने केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेरे असणे आवश्यक केले होते. शिवाय केंद्र संचालक व पर्यवेक्षणाच्या कामासाठी शिक्षकांची सरसकट अदलाबदल करण्याचा निर्णय घेतला होता. कॉपीमुक्त अभियानासाठी ज्या विविध सूचना आल्या, त्यामध्ये नेहमीच्या सूचने व्यतिरिक्त शिक्षक, कर्मचाऱ्यांची अदलाबदली करण्याचे सूचित केले होते.

## १४ फेब्रुवारी रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी करणार

# ई-बस सेवेचे उद्घाटन

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १ :



देशातील शहरी वाहतुकीला पर्यावरणपूरक आणि शाश्वत दिशा देणाऱ्या केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी पीएम ई-बस सेवा योजना सुरू करण्यात येत आहे. देशातील चार शहरांमध्ये ही सेवा सुरू केली जात असून नागपूरचाही यात समावेश आहे.

नागपूर मधील बस सेवेचा शुभारंभ १४ फेब्रुवारी रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी करणार आहेत. या योजनेअंतर्गत नागपूर शहरात सुरू होणाऱ्या ई-बस सेवेचे उद्घाटन पंतप्रधान आभासी (व्हर्च्युअल) पद्धतीने करणार असून, शहराच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत हा एक ऐतिहासिक टप्पा मानला जात आहे. नागपूरसह भावनगर, चंदीगड आणि गुवाहाटी या चार शहरांमध्ये ही सेवा एकाच वेळी सुरू होणार आहे. पहिल्या टप्प्यात नागपूर शहरातील प्रमुख आणि वर्दळीच्या मार्गांवर ३० उच्चतंत्रज्ञानयुक्त इलेक्ट्रिक बसेस प्रत्यक्ष सेवेत दाखल केल्या जाणार आहेत.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पंतप्रधान मोदी हे उद्घाटन कार्यक्रमासाठी गुवाहाटी येथे प्रत्यक्ष उपस्थित राहण्याची शक्यता आहे. उर्वरित तीन शहरांमध्ये - त्यात नागपूरचाही समावेश आहे - ई-बस सेवेचा शुभारंभ आभासी माध्यमातून होणार आहे. नागपूर महापालिकेच्या परिवहन विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ही माहिती दिली असून, पंतप्रधान कार्यालयाकडून लवकरच याबाबतची औपचारिक लेखी अधिसूचना अपेक्षित आहे. पीएम ई-बस सेवा योजनेच्या पहिल्या टप्प्यात नागपूरची निवड होणे, हे राष्ट्रीय शहरी वाहतूक आराखड्यात शहराचे वाढते महत्त्व अधोरेखित करणारे मानले जात आहे. वाढती लोकसंख्या, झपाट्याने होणारा शहरी विस्तार प्रदूषणाच्या समस्येच्या पार्श्वभूमीवर, इलेक्ट्रिक सार्वजनिक वाहतूक ही काळाची गरज बनली आहे.

# कंत्राटी कर्मचाऱ्यांचे राज्यव्यापी आंदोलन

■ महासागर प्रतिनिधी
बुलढाणा, दि. १ :



मनरेगा अंतर्गत मागील अनेक वर्षांपासून वेठीबिगार प्रमाणे कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांनी दोन टप्प्यात पुकारलेल्या आंदोलनामुळे राज्यातील रोहयो कामे जवळपास ठप्प झाली आहे. राज्यातील ३४ जिल्ह्यातील मजुरांची संख्या रोडावली आहे. या आंदोलनावर तोडगा न निघाल्यास ही कामे बंद पडण्याची चिन्हे आहे.

मागील २३ जानेवारी पासून ३४ जिल्ह्यातील मनरेगा च्या कंत्राटी कर्मचाऱ्यांनी असहकार आंदोलन पुकारले आहे. यामध्ये एमआयएस समन्वयक, कार्यक्रम व्यवस्थापक, सहायक कार्यक्रम अधिकारी, पॅनल तांत्रिक अधिकारी, क्लार्क कम डेटा ऑपरेटर, वाहन चालक यांचा समावेश आहे. या कर्मचाऱ्यांनी दैनंदिन कामकाजात असहकार करण्याचे आंदोलन सुरु केले.

यामुळे मनरेगा ची राज्यातील कामे विस्कळीत झाली. मनरेगा अंतर्गत कार्यरत कंत्राटी अधिकारी, कर्मचाऱ्यांना इतर योजनेतील कर्मचाऱ्या प्रमाणे शासन सेवेत कायम वा समायोजित करावे, एस-२ इन्फॉटिक मार्फत होणारी अनधिकृत व अवैध कर्मचारी भरती बंद करावी, कर्मचाऱ्यांची निवड राज्य निधी असोशियसन मार्फत निवड करावी, इतर योजनाप्रमाणे मनरेगाची स्वतंत्र यंत्रणा तयार करून पदनिहाय आकृतिबंध तयार करण्यात यावा या मागण्यासाठी राज्यातील कमी अधिक ४३०० कर्मचाऱ्यांनी एल्गार पुकारला आहे.

२३ जानेवारीपासून असहकार आंदोलन करण्यात येत आहे. मात्र याकडे शासन प्रशासनाचे दुर्लक्ष कायम आहे. यामुळे अखेर राज्यातील कर्मचारी संघटनेने उद्या २ फेब्रुवारी पासून मुंबई येथील आझाद मैदानावर राज्यव्यापी धरणे आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यातील सुमारे साडेचार हजार कंत्राटी कर्मचारी यात सहभागी होणार आहे. यामुळे ३४ जिल्ह्यातील मनरेगा ची कामे ठप्प होणार आहे.

दरम्यान या आंदोलनामुळे घरकुल, सिंचन विहीर, वृक्ष लागवड, फळबाग, पाणंद रस्ते आदि कामे ठप्प झाली आहे. राज्यातील ३४ जिल्ह्यात एरवी सरासरी ६ ते ७ लाख मजूर कामावर राहतात. सध्या ही संख्या जेमतेम १ लाखावार आली आहे. बुलढाणा जिल्ह्यात मागील दीड महिन्यापासून सरासरी १५ हजार मजूर कामावर होती.

# मानवी जीवनाचा विचार समग्रलक्षी दृष्टिकोनातून करणारे श्रीपाद जोशी

## डॉ. शैलेंद्र लेंडे यांचे प्रतिपादन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १ :





कथा, कविता, ललित लेखन, कादंबऱ्या यामागे ज्या विचारधारा असतात त्याचा तौलनिक अविष्कार आणि सांस्कृतिक विद्येला कवेत घेणारा ग्रंथ म्हणजे समीक्षेची संस्कृती आणि संस्कृतीची समीक्षा हा आहे. सामाजिकशास्त्र आणि मानवी विज्ञान यांची सांगड घालून मानवी जीवनाकडे समग्र दृष्टिकोन बाळगणाऱ्या विचारवंतांचे श्रीपाद भालचंद्र जोशी हे शेवटचे शिलेदार आहे हे या ग्रंथातून सिद्ध होते असे परखड मत डॉक्टर शैलेंद्र लेंडे यांनी मांडले.

विश्व मराठी परिषद, विदर्भ सांस्कृतिक परिषद, दिलीपराज प्रकाशन आणि पद्मगंधा प्रकाशन आयोजित ग्रंथसांगावा या समारोहामध्ये डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी द्वारा लिखित राजहंस प्रकाशन प्रकाशित त्यानंतर, पद्मगंधा प्रकाशन प्रकाशित सर्ग, दिलीपराज प्रकाशन प्रकाशित समीक्षेची संस्कृती आणि संस्कृतीची समीक्षा या तीन ग्रंथांचे प्रकाशन करण्यात आले. या समारोहाला मराठी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर अध्यक्षस्थानी उपस्थित होते. प्रख्यात ज्येष्ठ लेखक, समीक्षक डॉ.वि.स. जोग यांच्या हस्ते पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे डॉ.शैलेंद्र लेंडे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.


## निधन वार्ता

### सुलोचना जिचकार



नागपूर : दिवंगत डॉ. श्रीकांत जिचकार यांच्या आई सुलोचना रामचंद्र जिचकार यांना आज दिनांक ०१/०२/२०२६ रोजी सकाळी ०३:३० वा. देवाज्ञा झाली. त्या ९३ वर्षाच्या होत्या. त्यांची अंत्ययात्रा श्री, भरत नगर, अमरावती रोड, नागपूर स्थित निवास्थानावरून दुपारी ३ वा. निघेल. पार्थिवावर अँतिम संस्कार अंबाझरी दहन घाट नागपूर येथे करण्यात येईल.

## विकसित भारताच्या निर्मितीसाठी रूपरेषा देणारा अर्थसंकल्प : शहा



**नवी दिल्ली :** उत्पादन ते पायाभूत सुविधांपर्यंत, आरोग्य ते पर्यटन, ग्रामीण भाग ते कृत्रिम बुद्धीमत्ता हा एक असा अर्थसंकल्प आहे जो प्रत्येक गाव, शहर आणि शहरातील तरूण, महिला आणि शेतकऱ्यांच्या स्वप्नांना सक्षम बनवितो आणि पूर्ण करतो. पुढील २५ वर्षाचा रोडमॅप आणि २०४७ पर्यंत विकसित भारताच्या निर्मितीची रुपरेषा देणाऱ्या या अर्थसंकल्पाबद्दल प्रत्येक भारतियांच्या वतीने प्रंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांचे हार्दिक अभिनंदन अशी प्रतिक्रिया केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी व्यक्त केली.

## नवोपक्रमाला बळकटी देणारा अर्थसंकल्प : गडकरी



**नवी दिल्ली :** रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी रविवारी सांगितले की, केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२७ मध्ये शेतकरी, युवक, एमएसएमई यावर केंद्रित एक निर्णायक रोडमॅपची रूपरेषा आहे आणि देश विकसित अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेने प्रगती करत असताना समावेशक वाढ, नवोन्मेष आणि भांडवली गुंतवणुकीचा पाया मजबूत करणे हे आहे. उत्पादकता, स्पर्धात्मकता आणि उद्योजकता वाढवणाऱ्या आणि देशाला जागतिक उत्पादन आणि नवोन्मेष नेता म्हणून स्थान देणाऱ्या राजकोषीय धोरणाबद्दल गडकरी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांचे आभार मानले.

## राहुल गांधींचा अर्थसंकल्पावर भाष्य करण्यास नकार



**नवी दिल्ली :** लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केंद्रीय अर्थसंकल्पावर भाष्य करण्यास स्पष्टपणे नकार दिला. सोमवारी संसदेत ते आपले विचार मांडणार असल्याचे त्यांनी सांगितले. अर्थमंत्री सीतारमण यांनी सलग नऊ वेळा अर्थसंकल्प सादर केला. ही कामगिरी करणाऱ्या त्या भारताच्या पहिल्या अर्थमंत्री ठरल्या आहेत. परंतु, काँग्रेसने अर्थसंकल्पावर टीका करीत तो निराशाजनक असल्याचे म्हटले आहे.

## अत्यंत विस्कळीत अर्थसंकल्प : ममता बॅनर्जी



**कोलकाता :** पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी म्हटले की, तीन कॉरिडॉरबद्दल त्यांनी (अर्थमंत्र्यांनी) जे सांगितले ते निव्वळ खोटे आहे. हे प्रकल्प आधीपासूनच सुरू आहेत. आम्ही यावर काम सुरू केले आहे. पुरुलियामध्ये जंगलमहल जंगल सुंदरी प्रकल्पासाठी, या आर्थिक कॉरिडॉरमध्ये ७२००० कोटी रुपयांची गुंतवणूक केली जाईल. त्यांनी बंगालला एक पैसाही दिलेला नाही. खरं तर अर्थमंत्र्यांनी आज अर्थसंकल्पात तीन फ्रेट कॉरिडॉर, डंकुनी (प. बंगाल) ते सुरत (गुजरात) पर्यंत, दुगार्पूरमधील ईस्ट कोस्ट इंडस्ट्रियल कॉरिडॉर आणि वाराणसी ते सिलीगुडीपर्यंतच्या रेल्वे कॉरिडॉरबद्दल उल्लेख केला होता.

## युवा आणि महिलांना सशक्त करणारा अर्थसंकल्प : मेश्राम

**नागपूर :** अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी संत रविदास यांच्या जयंतीदिनी संसदेत सादर केलेला अर्थसंकल्प गरीब, शेतकरी, युवा आणि महिलांना सशक्त सशक्त बनविण्याच्या दिशेने महत्वपूर्ण पाऊल आहे अशी प्रतिक्रिया भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड. धर्मपाल मेश्राम यांनी व्यक्त केली. या अर्थसंकल्पात सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योजक, तरुण व्यवसायिक या सर्वांच्या सर्वसमावेशक विकासावर भर देण्यात आला आहे. पायाभूत सुविधा क्षेत्रात १२ लाख कोटींची गुंतवणूक, शेती, पशुपालन, मत्स्य व्यवसाय आणि सिंचन यासाठी भरीव तरतुदी करण्यात आल्या आहेत. ग्रामीण महिलांच्या नेतृत्वाखाली उद्योगासाठी शी मार्टस सुरू करण्यात येणार आहेत. या अर्थसंकल्पात अनुसूचित जाती आणि जमातीच्या निधीमध्ये १ लाख ९६ हजार कोटी आणि १ लाख ४१ हजार कोटी अशी सन्मानजनक भरीव वाढ करण्यात आल्याचे ॲड. मेश्राम यांनी म्हटले आहे.

## पर्यावरणपूरक भविष्याचा अर्थसंकल्प : आ. जोशी

**नागपूर :** केंद्रीय अर्थसंकल्प हा विकसित भारत या संकल्पनेला अधिक बख देणारा असून सर्वसामान्य नागरिक, मध्यम वर्ग, युवक, महिला आणि शेतकरी यांना केंद्रस्थानी ठेवणारा आहे असे आमदार संदीप जोशी यांनी म्हटले आहे. पायाभूत सुविधा, पर्यावरणपूरक वाहतूक, रोजगारनिर्मिती आणि आर्थिक स्थैर्य यांचा समतोल साधणारा अर्थसंकल्प आहे. देशातील महत्वाच्या शहरांना जोडणारे ७ हायस्पिड रेल्वे कॉरिडॉर्समध्ये महाराष्ट्रासाठी अत्यंत महत्वाचा असलेला मुंबई-पुणे हायस्पिड कॉरिडॉर ही राज्याच्या दृष्टीने दूरगामी परिणाम करणारी घोषणा आहे. त्यामुळे प्रवाशांचा वेळ कमी होणार असून पर्यावरणपूरक आणि आधुनिक वाहतुकीला चालना मिळणार आहे असेही आमदार संदीप जोशी यांनी म्हटले.

## सर्वसमावेशक अर्थसंकल्प : नरेश चरडे

**नागपूर :** अर्थसंकल्प हा विकसित भरात संकल्पनेला बख देणारा असून देशाच्या सर्वांगीण प्रगतीकडे नेणारा आहे. या अर्थसंकल्पात मध्यम आणि लघु उद्योगांना प्रोत्साहन देण्यात आले आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होणार आहेत. उद्योजकता वाढीस लागून स्थानिक पातळीवर आर्थिक सशक्तीकरणाला चालना मिळणार आहे आत्मनिर्भर भारत या संकल्पनेला प्रत्यक्षात उतरविण्यासाठीया अर्थसंकल्पात ठोस तरतुदी करण्यात आल्या आहेत. देशांतर्गत उत्पादन, स्वदेशी उक्षेग आणि नवकल्पनांना प्रोत्साहन देत भारताला स्वयंपूर्ण बनविण्याचा स्पष्ट संकल्प यात दिसून येतो असे वाडी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष नरेश चरडे यांनी म्हटले आहे.

## तोंडाला पाने पुसणारा अर्थसंकल्प : बैस

**नागपूर :** केंद्रीय अर्थसंकल्प हा केवळ आकड्यांची जुळवाजुळव असून महाराष्ट्र व विशेषतः विदर्भाच्या तोंडाला पाने पुसणारा आहे असे काँग्रेस कमेटी नागपूर ग्रामीणचे जिल्हाध्यक्ष अश्विन बैस यांनी म्हटले आहे. विदर्भातील सिंचन, रेल्वे, शेतकऱ्यांचे प्रश्न, कापूस व सोयाबिनला हमीभाव याबाबत कोणतीही ठोस तरतूद नाही. शेतमजूर, ग्रामीण कष्टकरी व सुशिक्षित बेरोजगार युवकांसाठी रोजगारांच्या संधी निर्माण करण्यात सरकार अपयशी ठरले आहे. महिलांचे सक्षमीकरण, महागाई नियंत्रण आणि असंघटित कामगारांच्या सामाजिक सुरक्षेबाबत अंदाजपत्रक निराशाजनक आहे. हे अंदाजपत्रक शब्दांचा फुलोरा असून सर्वसामान्यांच्या हिताचा नाही असेही बैसे यांनी म्हटले आहे.

## शेतकरी नाराज : थोरात

**नागपूर :** शतेकऱ्यांसाठी कर्जमाफी तसेच स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशीनुसार हमीभावाबाबत कोणतीही ठोस घोषणा न झाल्याने शेतकरी वर्गात तीव्र नाराजी आहे. उत्पन्न घटत असतानाही त्यांना अपेक्षित दिलासा दिला नाही. महागाई वाढलेली आहे. आयकर स्लॅबमध्ये बदलांची अपेक्षा असलेल्या मध्यम वर्गालाही फारसा लाभ झाला नाही. टीडीएस प्रणाली सुलभ करण्यासाठी ठोस पावले उचलली नाहीत.

# अंमली पदार्थ तस्करीला पायबंद घालण्यासाठी दोन टास्क फोर्सची निर्मिती

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १ :

अंमली पदार्थ तस्करीला पायबंद घालण्यासाठी गृहमंत्रालयाने राज्यात दोन टास्क फोर्सची निर्मिती केली. यात विदर्भ, मराठवाड्यातील १९ जिल्ह्यांसाठी एक आणि उर्वरित महाराष्ट्रासाठी दुसरा टास्क फोर्स तयार झाला. दोन्ही टास्ट फोर्ससाठी नागपूर आणि पुणे मुख्यालय निश्चित झाले. तरीही महसूल गुप्तचर संचालनालयाच्या (डीआरआय) गुप्तचरांनी पोलिस आणि टास्क फोर्सवर कुरघोडी करत ड्रग्ज तस्कर टोळ्यांपासून ते सडकी सुपारी माफियांचे जाळे उध्वस्त केले. त्यामुळे टास्क फोर्ससाठी निर्माण केलेले मनुष्यबळ पांढरा हत्ती ठरत आहे, का असा प्रश्न उपस्थित होत आहे.

अंमली पदार्थ तस्करी करणाऱ्या जाळ्यांना मोठा धक्का देत, डीआरआयच्या पथकाने ऑपरेशन हिंटरलँड ब्रू अंतर्गत वर्धा जिल्ह्यात कारंजा येथे मेफोड्रेनचा कारखाना उध्वस्त केला. त्यानंतर वर्धा जिल्हा पोलीस अधिक्षक अनुराग जैन यांची उचलबांगडी झाली. त्याच्या अगदी काही महिन्यांत पुन्हा डीआरआयने सावनेर जवळ अर्धा टनाहून अधिक वजनी गांजा पकडला. या दोन्ही कारवायात डीआरआय गुप्तचर विभाग पथक पोलिसांच्या यंत्रणेपेक्षा वरचढ ठरले. डीआरआयने सडकी सुपारीचे हब असलेल्या नागपुरातील माफियांचेही जाळे उध्वस्त केले. या खेरीज आंध्र ऋ तेलंगणाच्या सिमेवरून खवल्या मांजराचे १८ किलोग्राम वजनी कातडे जप्त करत वन विभागावरही मात केली. डीआरआयच्या पथकांनी २०२५ या वर्षात एकूण ६ मोठ्या कारवाया केल्या.

राज्याचे गृहमंत्रालय पोलीसांच्या गुप्तचर यंत्रणेवर कोट्यवधी रुपये खर्च करते. अशा वेळी अंमली पदार्थ तस्करीचे जाळे भेदण्यासाठी राज्य सरकारने दोन्ही टास्क फोर्समध्ये पोलीस उपमहानिरीक्षक, पोलीस अधिक्षक, अप्पर अधिक्षक, निरीक्षक, सहाय्यक निरीक्षक, उपनिरीक्षक, हवालदार शिपाई आणि चालक अशी पदे निर्माण केली. त्यासाठी २२ कोटींची तरतूदही केली. तरीही महसूल गुप्तचर संचालनालयाला जर अंमली पदार्थ नेटवर्क उघडकीस आणावे लागत असेल, तर टास्क फोर्स आणि पोलिसांची गुप्तचर यंत्रणा काय करते आहे, असा सवाल उपस्थित होत आहे. अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स सध्या प्राथमिक टप्प्यात आहे. त्यामुळे विदर्भ आणि मराठवाड्यात जाळे विस्तारले जात आहे. आतापर्यंत फोर्सने चार मोठ्या कारवाया केल्या आहेत.